दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatan@gmail.com | शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ | अंक : १४३ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८




विजय हजारे ट्रॉफीची मॅच खेळली...

(पान ५ वर)



महापालिका निवडणुकीआधी राष्ट्रवादीचा मास्टरप्लॅन

(पान ३वर)



## महत्त्वाचे...

### चार वर्षांच्या चिमुरड्याचा मृत्यू



लाखांदूर- शहरात शुक्रवारी सकाळी घडलेल्या एका भीषण रस्ते अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. एका मद्यधुंद ट्रॅक्टर चालकाच्या बेफिकीर आणि बेजबाबदार वर्तनामुळे हा अपघात घडला असून, यात एक चार वर्षांचा चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. सकाळच्या शांत वेळेत, कामासाठी निघालेल्या ट्रॅक्टरने अचानक रस्ता दुभाजकाला जोरदार धडक दिल्याने ट्रॅक्टर ट्रॉलीसह उलटल्याचा थरारक प्रसंग घडला. या दुर्घटनेत ट्रॅक्टर चालकासह त्याच्यासोबत असलेला लहान मुलाचा मृत्यू झाला असून, या घटनेने लाखांदूर शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. निष्पाप बालकाचा जीव धोक्यात घालणाऱ्या या प्रकारामुळे नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.ही घटना शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर रोजी सकाळी सुमारे साडेसात वाजताच्या सुमारास घडली. लाखांदूर येथील रहिवासी निलेश अवसरे (वय 28) हा आपल्या काही सहकाऱ्यांसह ट्रॅक्टरने कामानिमित्त बाहेर पडला होता. मात्र, प्रत्यक्षात ट्रॅक्टर चालवताना तो पूर्णपणे मद्याच्या नशेत असल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षदर्शींनुसार, ट्रॅक्टर अतिशय वेगात आणि चुकीच्या दिशेने जात होता. अचानक वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर थेट रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकावर आदळला. धडकेचा आवाज इतका जोरदार होता की, काही क्षणांसाठी परिसरात एकच खळबळ उडाली आणि रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली. अपघाताची तीव्रता अत्यंत भयावह होती. ट्रॅक्टरने धडक दिल्यामुळे रस्त्यावरील लोखंडी कठडे पूर्णपणे मोडून पडले. ट्रॅक्टरची ट्रॉली धडकेनंतर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जाऊन उलटली. या दुर्घटनेत चालक नीलेश अवसरे याच्यासह त्याच्यासोबत असलेला दक्ष अवसरे (वय 4 वर्षे) हा गंभीर जखमी झाला. जखमी झालेला दक्ष हा नीलेशचा पुतण्या असल्याचे समोर आले आहे. स्वतःच्या कुटुंबातील लहान मुलाला सोबत घेऊन मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवण्याचा प्रकार समोर आल्याने या घटनेचे गांभीर्य अधिक वाढले आहे. रस्त्यावर पडलेला उलटलेला ट्रॅक्टर आणि चिरडलेले कठडे पाहून अपघात किती भीषण होता, याची कल्पना नागरिकांना आली.अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. काहींनी जखमींना बाहेर काढण्यास मदत केली, तर काहींनी तातडीने रुग्णवाहिकेसाठी आणि मदतीसाठी संपर्क साधला.

# आजपासून नागपुरात 'अक्षर साहित्य संमेलन'

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन अनुदानित 'अक्षर साहित्य संमेलनाचे चे आयोजन महात्मा फुले शिक्षण संस्था सभागृह रेशीमबाग, नागपूर येथे कला गौरव संस्था व अक्षरक्रांती फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. राम गणेश गडकरी प्रतिष्ठान प्रायोजित हा साहित्य महोत्सव असणार आहे.

साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा. डॉ. गिरीष गांधी (अध्यक्ष, वनराई फाऊंडेशन) हे राहणार आहेत. नुकतीच सावनेर येथे राम गणेश गडकरी निवासस्थानी मा. डॉ. गिरीष गांधी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत जेष्ठ कथाकार मा. वसंत वाहोकर यांची साहित्य महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली. तसेच विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मा. प्रदीप दाते यांची उद्घाटकपदी निवड करण्यात आली आहे.

उद्घाटन सत्राला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य तथा दै.महाराष्ट्र टाइम्सचे संपादक मा. श्रीपाद अपराजित तथा माजी सदस्य विलास सिंदगीकर प्रमुख अतिथी असतील. विशेष उपस्थिती म्हणून प्रसिद्ध कादंबरीकार व कथाकार मा. उर्मिला देवेन टोक्यो (जपान) तसेच सुप्रसिद्ध कवी मनोज भारशंकर, अबुधाबी (यूएई) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. साहित्य महोत्सवाच्या उद्घाटन सत्रात देश-विदेशातील मराठी साहित्यिकांच्या कथा, कविता, वैचारिक लेख, समीक्षा इत्यादींचा समावेश असलेली स्मरणिका तसेच साहित्यिक मंडळींच्या डझनभर पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. समारोपीय सत्राला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य मा. डॉ. प्रमोद मुनघाटे तथा अखिल भारतीय मराठी साहित्यमंडळाचे सदस्य मा. डॉ. गजानन नारे तसेच जेष्ठ साहित्यिक मा. तीर्थराज कापगते हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवसीय साहित्य महोत्सव एकूण अकरा सत्रात संपन्न होणार आहे. उद्घाटन सत्राच्या सुरुवातीला 'महाराष्ट्राची लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित असून यात भूपाळी, वासुदेव आला, भारूड, पोवाडा, लावणी, दिंडी यांचे आयोजन केले आहे. 'ग्रामीण संस्कृती दर्शन' हा कार्यक्रमाचे सादरीकरण कला गौरव संस्थेची चमू करणार आहे.

या दोन दिवसीय साहित्य महोत्सवात 'प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेमधूनच असायला हवं' या विषयावर परिसंवाद होणार असून 'शेती हा उद्योग झाल्याशिवाय आत्महत्या थांबणार नाहीत', या विषयावर चर्चासत्र आयोजित केले जाणार आहे.

बाल कवीसंमेलन, गझल संमेलन, वऱ्हाडी कवीसंमेलन, निमंत्रितांचे कवीसंमेलन, कथाकथन, प्रकट मुलाखत, नवोदितांचे कविसंमेलन इत्यादी अकरा सत्र राहणार आहेत. संत्रानगरीच्या नागपूरकर मंडळींना हिवाळ्याच्या गुलाबी थंडीत साहित्यिक मेजवानी मिळणार आहे.

सभेला प्रामुख्याने आयोजन समितीचे तथा अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष मा. शंकर घोरसे, उपाध्यक्ष मा. गणेश भाकरे, सचिव तथा कला गौरव संस्थेचे अध्यक्ष डॉ. संगीता बानाईत, सहसचिव मा. प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', कोषाध्यक्ष मा. भागवत बानाईत, सदस्य मा. देवेंद्र काटे, मा. सचिन सुकलकर, मा. वंदना घोरसे, ॲड्. अरविंद लोधी, मा. बाबा निमजे, मा. संजय टेंभेकर, प्रा. कोल्हे, मा. वर्षा ढोके, मा.अमीन सय्यद इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. या साहित्यिक मेजवानीचा भरभरून लाभ नागपूर व परिसरातील साहित्यिक मंडळींनी व रसिक-श्रोत्यांनी अवश्य घ्यावा; असे आवाहन साहित्य महोत्सव आयोजन समितीचे प्रमुख शंकर घोरसे व सचिव डॉ. संगीता बानाईत यांनी केले आहे.




# बेकायदेशीरपणे शासकीय शुल्क वसूल करणाऱ्या गुंफलवार वर कारवाईची मागणी

**मे.ब्लॅक संसुई वेट मशीनचे प्रोप्रायटर अभिषेक गुंपलवार**

**यांच्यावर शासन व ग्राहकांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप**

**दिव्य वतन /सतीश कडू**

नागपूर : नागपूरः नागपूर विभागात बेकायदेशीर वजन काट्यांद्वारे सर्वसामान्य नागरिकांची तसेच शासनाची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात वैधमापन शास्त्र विभागाकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत मे. ब्लॅक संसुई वेट मशीनचे प्रोप्रायटर श्री. अभिषेक गुंपलवार यांचे नाव थेट नमूद करण्यात आले असून, त्यांच्यावर गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, श्री. अभिषेक गुंपलवार यांच्या मालकीच्या मे. ब्लॅक संसुई वेट मशीन कंपनी मार्फत नियमबाह्य व अवैध वजन काट्यांचे उत्पादन व विक्री दुरुस्ती करण्यात येत आहे. हे वजन काटे वैधमापन शास्त्र कायदा 2009 व नियम 2011 चे उल्लंघन करणारे असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, या वजन काट्यांच्या पडताळणी (Verification) व मुद्रांकन (Stamping) शुल्काची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा न करता ती परस्पर लाटण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे एकीकडे शासनाची आर्थिक फसवणूक झाली असून, दुसरीकडे चुकीच्या वजन काट्यांमुळे ग्राहकांची थेट लूट व फसवणूक होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. हा प्रकार केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा नसून, आर्थिक घोटाळा व संगनमताचा संशय निर्माण करणारा असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

तक्रारीत पुढे असा आरोप करण्यात आला आहे की, या गंभीर गैरप्रकाराकडे वैधमापन शास्त्र विभागातील काही अधिकारी व निरीक्षक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून, दोषींवर कारवाई न करता त्यांना अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांनी मागणी केली आहे की, मे. ब्लॅक संसुई वेट मशीनचे प्रोप्रायटर श्री. अभिषेक गुंपलवार यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करून बेकायदेशीर वजन काटे जप्त करण्यात यावेत, पडताळणी व मुद्रांकन शुल्काच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करावी, संबंधित परवाने रद्द करावेत तसेच शासनाच्या तिजोरीत झालेल्या नुकसानीची वसुली करण्यात यावी.

दरम्यान, या प्रकरणामुळे वैधमापन शास्त्र विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासन या गंभीर आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात काय ठोस पावले उचलते याकडे नागपूर विभागासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय किसान सन्मान दिन उत्साहात साजरा

## वस्त्रोद्योग मंत्रालया अंतर्गत कस्तुरी कॉटन उत्पादनास चालना

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**



नागपूर : भारताचे माजी पंतप्रधान स्व.चौधरी चरणसिंग यांच्या जयंतीनिमित्त २३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय किसान सन्मान दिनाचे आयोजन भारतीय वस्त्रोद्योग महासंघ (CITI CDRA) आणि कापूस तंत्रज्ञान संशोधन प्रशिक्षण संस्था (CIRCOT), यांच्या संयुत्क विद्यमाने नागपूर येथे करण्यात आले. कार्यक्रमाला कापूस विकास संचालनालयाचे संचालक डॉ.अरविंद वाघमारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, विदर्भ कापूस असोसिएशनचे अध्यक्ष भावेश शहा, झायडेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे प्रादेशिक प्रमुख शुभम ढोणे, टेक्सप्रोसीलचे सहायक संचालक अक्षय बुचडे, CIRCOTचे प्रमुख डॉ.के. पांडियन यांच्यासह CITI-CDRA महाराष्ट्रचे प्रकल्प समन्वयक जी.एच.वैराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. वस्त्रोद्योग मंत्रालया अंतर्गत कस्तुरी कॉटन उत्पादनास चालना देण्यासाठी कापुस उत्पादकांना प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमास कापूस उत्पादक शेतकरी, कापूस जिनिंग प्रतिनिधी, संशोधन संस्था तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिघन लागवड पद्धतीद्वारे उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये श्री निंबाळकर, राजेंद्रजी उडान, सौ.सुधाताई कोटलकार आणि ओमकार विटले यांचा समावेश होता. गोविंद वैराळे यांनी उच्च घनता लागवड प्रणाली (HDPS) आणि अतिरिक्त लांब धाग्याच्या (ELS) कापूस लागवडी बाबत क्षेत्रीय अनुभव मांडले. सांगली जिल्ह्यात नुझीवेडू सीड्सच्या सहकार्याने शेतकऱ्यांना प्रति एकर १० ते १२ क्विंटल उत्पादन मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

कृषी विभागाचे जिल्हा कृषी अधीक्षक रवींद्र मनोहरे यांनी शेतकऱ्यांना शाशकीय योजनानचा फायदा घेण्याकरिता मार्गदर्शन केले. कापूस विकास संचालनालयाचे संचालक डॉ.ए.एल.वाघमारे यांनी कापूस विकासासाठी धोरणात्मक व संस्थात्मक पाठबळाचे महत्त्व स्पष्ट करत विविध विभागांमधील समन्वयातून HDPS तंत्रज्ञानाचा विस्तार करण्यावर भर दिला. अक्षय बुचाडे यांनी वस्त्रोद्योग मंत्रालया अंतर्गत कस्तुरी कॉटन ब्रांड उत्पादनाचे फायदे विषद केले. हा कार्यक्रम CITI- CDRA नागपूरचे प्रकल्प अधिकारी युगान्तर मेश्राम, वर्धा व सांगली जिल्ह्यांचे प्रकल्प अधिकारी अमित कावडे आणि संपूर्ण टीमच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला. CITI-CDRA महाराष्ट्रचे प्रकल्प अधिकारी जगदीश नेरलवार यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.

# निशा खापरे यांच्या 'आयुष्याची नवी पहाट' काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : काव्यप्रेमी शिक्षक मंच आयोजित 16 वे साहित्य संमेलन 21 डिसेंबर ला भंडारा येथे संपन्न झाले. याप्रसंगी नागपूरच्या सुप्रसिद्ध कवयित्री निशा खापरे यांच्या "आयुष्याची नवी पहाट" या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले आहे.

काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संमेलनाध्यक्ष प्रदीप दाते सर ( विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष ), उद्घाटक मा. राजा धर्माधिकारी, स्वागताध्यक्ष मा. दीपक सपकाळ यांचे हस्ते पार पडला.

यावेळी प्रमुख अतिथी मा. राजेंद्र फंड, काव्यप्रेमी शिक्षक मंचाचे राज्याध्यक्ष मा. आनंद घोडके, सचिव मा. कालिदास चवडेकर, कोषाध्यक्ष मा. कृष्णा शिंदे सर तसेच समस्त राज्यसमिती पदाधिकारी, नागपूर विभाग पदाधिकारी, नागपूर जिल्हा पदाधिकारी यांची विशेष उपस्थिती होती.

'आयुष्याची नवी पहाट' या काव्यसंग्रहाला महाराष्ट्रातील प्रथितयश कवी, लेखक व समीक्षक मा. डी. बी. जगत्पुरिया याची अभ्यासू प्रस्तावना असून सुप्रसिद्ध ब्लर्बमास्टर मा. प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी काव्यसंग्रहाची आस्वादनपूर्ण पाठराखण केली आहे. पुणे येथील साहित्यिक मा.



राजन लाखे यांची प्रोत्साहनपर शुभेच्छा लाभली आहे. अविशा प्रकाशनाची निर्मिती सर्वांगसुंदर आहे; हे विशेष!

# भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा शाखा (पश्चिम) पुनर्गठन सभा

## शनिवारी कळमेश्वर येथे आयोजन

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**


कळमेश्वर- भारतीय बौद्ध महासभा (संस्थापक अध्यक्ष बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर) व राष्ट्रीय संरक्षक आदरणीय महाउपासिका मिराताई आंबेडकर, तसेच ट्रस्टी व राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय बौद्ध महासभा "नागपूर जिल्हा शाखा (पश्चिम)" यांची शाखा पुनर्गठन सभा आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता त्रिरत्न बुद्ध विहार, हुडको कॉलनी, कळमेश्वर येथे संपन्न होणार आहे. या सभेत भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा शाखा (पश्चिम) ची नवीन कार्यकारिणी गठित करण्यात येणार आहे.या पुनर्गठन सभेसाठी काटोल, कळमेश्वर, सावनेर, बुटीबोरी, नरखेड व हिंगणा तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा संघटनेची जबाबदारी स्वीकारण्यास इच्छुक असलेले सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तमाम बौद्ध बांधवांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर आवाहन समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय संघटक इंजि. पद्माकर गणवीर यांनी केले आहे. ही सभा संघटनात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असून नागपूर जिल्ह्यातील बौद्ध चळवळीला नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# तासिका प्राध्यापकांच्या जीवन व्यथांचा वेध घेणारी विजया मारोतकर यांच्या "अजूनही..." या कादंबरीचे थाटात प्रकाशन

"आजच्या शिक्षण व्यवस्थेत भरडल्या जाणाऱ्या तासिका प्राध्यापकाच्या भोगवट्याच्या व्यथांचे बारकाईने निरीक्षण करून त्यावर विवेचन करणारी.. त्या वास्तवाचे नेमके चित्रण करणारी .... संवेदनशील शब्दकळा असलेली.. सामाजिक पातळीवरच्या पांढरपेशा समाजातील उच्च शिक्षितांच्या होणाऱ्या आर्थिक कोंडी बाबत नितांत धाडसाने विजया मारोतकर यांनी लिहिलेली कादंबरी म्हणजे.. डिंपल पब्लिकेशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेली "अजूनही.." ही कादंबरी होय.. जी"अजूनही" या शीर्षकाला समर्पक आहे. आजवर लिहिल्या न गेलेल्या विषयावर लिहिलेली ....नितांत ताकदीची... हातात घेतल्यानंतर संपल्याशिवाय खालीच ठेवल्या जात नाही.. अशी वाचनीय ही कादंबरी आहे .. ..आपण सर्व वाचकांनी ती जरूर वाचावी ..असे उदगार सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. प्रकाश राठोड यांनी काढले. डिंपल प्रकाशन मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या" अजूनही. " या कादंबरीच्या प्रकाशन प्रसंगी भाष्यकार म्हणून ते मंचावरून बोलत होते.

सेवादल महिला महाविद्यालयाच्या सभागृहात या कादंबरीचा प्रकाशन सोहळा थाटात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय संजय शेंडे होते तर उद्घाटक माधुरीताई आशिरगडे होत्या..भाष्यकार म्हणून डॉ.प्रमोद लेंडे यांच्या सह मंचावर सुप्रसिद्ध कादंबरीकार विजयाताई ब्राह्मणकर ,महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.निरुपमा ढोबळे, मराठीविभाग प्रमुख डॉ. सुशील मेश्राम, लेखिका विजया मारोतकर.. मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानचे मंगेश बावसे ,डॉ. माधव शोभणे उपस्थित होते. डॉक्टर प्रकाश राठोड पुढे म्हणाले "सहज सोपी भाषा. विचार करावयाला लागणारी वाक्ये नायक अजय आणि नायिका पूनम यांच्या जगण्याच्या संघर्षाला कारण असलेला "तासिका प्राध्यापक " या विषयाची नितांत समर्पक केलेली मांडणी.. समाजात याचे पडणारे पडसाद नीतिमूल्य जपणारी नायिका.. हे सारे संतुलन सांभाळत तासिका प्राध्यापकांच्या व्यथांना वाचा फोडणारी मराठी साहित्यातली ही.. या विषयावरील पहिली कादंबरी होय. या कादंबरीचे भविष्य नितांत उज्वल आहे.

दुसरे भाष्यकार डॉ. प्रमोद लेंडे खैरकर म्हणाले .. "तासिका प्राध्यापकांच्या जगण्यातील व्यथा वेदनांचा वेध घेणारी विजयाताई मारोतकर यांनी लिहिलेली "अजूनही.." कादंबरी मी स्वतः जगलेलो आहे . आपल्या परिघाबाहेरच्या दुःखाची कादंबरी लिहिण्याच्या विजयाताईंच्या लेखन कार्याला आमचा



मानाचा मुजरा ..!दुसऱ्यांच्या दुःखाकडे पाहण्यासआज कुणाला वेळ नाही अशा काळात ..स्वतः तासिका प्राध्यापिका नसतानाही आमच्या व्यथा वेदनांचा जागर करण्याचे धाडस करणाऱ्या विजया ताईंचे मला मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते."

हाच धागा पुढे नेत कार्यक्रमाच्या उद्घाटक माधुरीताई आशीरगडे म्हणाल्या मी विजया मारोतकर ला गेल्या अनेक वर्षांपासून जाणते. साहित्याच्या सगळ्याच आघाड्यांवर लेखाजोखा लिहावा लागला तर ती गुणवत्ता यादीमध्ये येईल ..मग ते कविता असो.. कथा असो... वक्तृत्व असो की साहित्य संमेलनांमध्ये सत्राची कुठलीही जबाबदारी असो ..साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद असो की दर्जेदार अशा साहित्य संमेलनाचे आयोजन असो... त्यातल्या त्यात स्वतः एकटी पुढे न जाता आपल्या सोबत इतरांना कसे पुढे नेता येईल याकरता तिची कायम धडपड असते.. मला तर तिचे फार कौतुक वाटते. वैष्णव जन तो.. तेने कहीये.. जो पीड पराई जाने रे...

नेमके तयाच भावनेने विजयाने तासिका प्राध्यापकांच्या जगण्याच्या वेदनांचा वेध घेण्याकरता "अजूनही.." ही कादंबरी लिहावी. या तिच्या भावनेचे ही करावे तेवढे कौतुक कमीच आहे. ही कादंबरी साहित्य विश्व प्रचंड यशस्वी होईल. त्यावर चित्रपट निघेल...दूरदर्शन मालिका तयार होतील इतक्या ताकदीची आहे.

मनोगत व्यक्त करताना विजया मारोतकर म्हणाल्या की "अवतीभवतीचा तासिका प्राध्यापकांच्या व्यथांचा हा सलणारा प्रश्न मला सततच हा साद घालत होता. 2019 पासून मी ही कादंबरी लिहत आहे. अनेक टिपण, निरीक्षण आणि नोंदी नोंदवत संशोधन करावे इतकी तथ्य गोळा केल्यानंतर हे कादंबरी लेखन पूर्णत्वास गेले. या कादंबरी ला डिंपल प्रकाशनाने नितांत देखण्या स्वरूपात सर्वांसमोर आणले आणि आज आपण त्यावर दिलखुलास भाष्य केले... याबद्दल मी आपणा सर्वांची आभारी आहे. प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष मा.संजय शेंडे म्हणाले की मी स्वतः शिक्षण क्षेत्रात वावरत आहो.अनेकदा नियमांच्या चौकटीत आम्हाला आमच्या मनाप्रमाणे निर्णय घेता येत नाही. समाजातील दुःख पाहून आम्ही ही हळवे होतो. निदान आम्ही तरी आमच्या पातळीवर तासिका प्राध्यापकांचे जगणे जेवढे सुरेख करता येईल तेवढ करण्याचा प्रयास करतोच परंतु काही नियमच इतके जटील आहे की त्यापुढे काही करता येणे शक्य नसते .ही जटिलता कमी होऊन तासिका प्राध्यापकांच्या जीवनात सूर्योदय व्हावा असे आम्हालाही वाटते. विजयाताईंनी मात्र या वेगळ्या विषयाला हात घालून शासनासकट सगळ्यांचे लक्ष वेधण्याचा केलेला प्रयास नक्कीच मला स्तुत्य वाटतो. कार्यक्रमाला सुप्रसिद्ध कादंबरीकार विजयाताई ब्राह्मणकरही मंचावर उपस्थित होत्या. त्यांनी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक गोविंद सालपे यांनी केले. सूत्रसंचालन डॉक्टर पद्मिनी दुरगकर यांनी केले तर आभार डॉ.सुशील मेश्राम यांनी मानले

कार्यक्रमाला अनेक तासिका प्राध्यापक, सेवादल महिला महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग विद्यार्थी, मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानचे सर्व सदस्य आणि साहित्य रसिक मंडळी उपस्थित होती.

**कार्यालय – ग्रामपंचायत भोसा**

**प.स.आमगाव, जि. गोंदिया**

**ई-निविदा सूचना** क्रमांक 01/2025-26 (पहिली वेळ)

दिनांक :- २६/१२/२०२५

या ई-निविदा सुचनेद्वारे सर्व इच्छुक साहित्य पुरवठा धारकांना सूचित करण्यात येते कि, ग्रामपंचायत भोसा येथे २०२५- २६ या कालावधी करिता १५ वा वित्त आयोग व इतर शासकीय विविध विकास योजना अंतर्गत होणाऱ्या बांधकाम करिता लागणारे साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचते दरानी फक्त दरपत्रक मांगविण्यात येत आहे. तरी पुरवठा धारकांनी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २६/१२/२०२५ पासून प्रकाशित अटी व शर्ती लक्षात घेऊन दिनांक ०१/०१/२०२६ दु.०५.३० वाजे पर्यंत आपली निविदा ऑनलाईन पद्धतीने सादर करावी. निविदे विषयीचे संपूर्ण तपशील महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर उपलब्ध्द आहे. पुरवठादाराला सदर निविदा ऑनलाइन भरायची आहे. काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालय भोसा येथे कार्यालयीन वेळेवर संपर्क साधावे. निविदा विषयीचे सर्व अधिकार ग्रामपंचायत कडे सुरुक्षित राखून ठेवण्यात आले आहे.

**स्वा/-**
**सरपंच / उपसरपंच / ग्रा.पं. अधिकारी**
ग्रामपंचायत भोसा



आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात चंद्रपूर महानगरपालिका निवडणूक होणार

(पान ३ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदूरबार, धुळे, नाशिक



जोडे चाटून मते मागण्याचे उद्धव ठाकरेंचे राजकारण

(पान ६ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ अंक : १४३ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


# शरद पवार एनडीएमध्ये येऊ शकतात-मंत्री संजय शिरसाट

## त्यांना घ्यायचे की नाही हे भाजपचे वरिष्ठ नेते ठरवतील

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी करणार का? असा सवालही राजकीय वर्तुळात उपस्थित झाला आहे. यावर बोलताना शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले की, अजित पवार सत्तेत आहेत, ते कुठे जाणार नाहीत. परंतु, शरद पवार एनडीएमध्ये येऊ शकतात, असा दावा शिरसाट यांनी केला आहे.


संजय शिरसाट म्हणाले, अजित दादा सत्तेमध्ये आहेत. त्यांच्याकडे महत्त्वाचे पद आहे. त्यामुळे अजित दादा कोणीकडे जाणार नाहीत. परंतु, शरद पवार एनडीएमध्ये येऊ शकतात. शरद पवार यांना एनडीएमध्ये घ्यायचे की नाही, हा निर्णय भाजपचे वरिष्ठ ठरवतील. राष्ट्रवादीची भाजपसोबत आघाडी आहे आणि भाजपसोबत आहे. म्हणून भाजपची शरद पवार यांच्याबद्दल काय भूमिका असेल ती भाजपने ठरवावी. शरद पवार हे जास्त काही विरोधी पक्षात राहू शकत नाहीत. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास बघितला तर त्यांनी अनेक वेळा असे उलटे-सुलटे प्रयत्न केले आहेत, असे शिरसाट म्हणाले.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, शरद पवार यांना एनडीएमध्ये घ्यायचे की नाही हे एनडीएच्या नेत्यांनी ठरवायचे आहे. आम्ही पहिल्यापासून सांगत आलो आहोत, भाजपची आणि आमची नैसर्गिक युती आहे. इतर घटक पक्ष एनडीएमध्ये येत असतील तर त्याला भाजप जबाबदार राहील, आम्ही नाही, असेही शिरसाट यांनी स्पष्ट केले.

### आज किंवा उद्या युतीची घोषणा होईल

आगामी निवडणुकांच्या संदर्भात बोलताना सणजे शिरसाट म्हणाले, भाजप आणि शिवसेनेकडे इच्छुकांची गर्दी जास्त आहे. कोणता प्रभाग सोडायचा, तसेच कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ नये ही आमची भूमिका आहे. इच्छुक हस्त आहेत आणि जागा कमी आहेत, म्हणून कोणती जागा घ्यायची आणि लढवायची ही चर्चा होणे गरजेचे आहे. आज किंवा उद्या युतीची घोषणा होईल. भाजप-शिवसेनेने छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणूक युतीमध्ये लढवण्याचा निर्णय घेतला आहे. दोन-चार जागेवर जे आलेले आहे, त्यावर मंत्री अतुल सावे आणि मी चर्चा करणार आहोत आणि योग्य निर्णय घेणार आहोत.पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, युतीबाबत चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. कोण कुठे लढणार याची यादी एक-दोन दिवसात फायनल होईल. अतुल सावे आणि मी फायनल चर्चा करून, ती यादी भाजपा आणि शिवसेनेच्या वरिष्ठांना पाठवू आणि नंतर जाहीर केली जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे.





## महत्त्वाचे...

### पिंपरीत आम्ही १२८ पैकी १२५ जागा जिंकणार

#### भाजप आमदार शंकर जगतापांचा दावा




पुणे - एकेकाळी अजित पवारांचा अभेद्य बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरात आता राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. भाजप आमदार शंकर जगताप यांनी आगामी महापालिका निवडणुकीत भाजपला 128 पैकी 125 जागा मिळतील, असा दावा केला आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे खंबीर नेते राहुल कलाटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षाची ताकद प्रचंड वाढली असून, हा विरोधकांसाठी मोठा धक्का असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी आमदार शंकर जगताप यांनी भाजप 100 जागा जिंकेल असा विश्वास व्यक्त केला होता. मात्र, राहुल कलाटे यांच्या भाजप प्रवेशानंतर त्यांनी हा आकडा 125 वर नेला आहे. राहुल कलाटे यांनी यापूर्वी जगताप परिवाराविरोधात आक्रमक निवडणुका लढवल्या होत्या, मात्र आता तेच सोबत आल्याने भाजपची स्थिती अधिक मजबूत झाली आहे. विशेष म्हणजे, उर्वरित तीन जागा अजित पवारांची राष्ट्रवादी जिंकणार का? या प्रश्नावर मात्र जगतापांनी सूचक मौन बाळगले. नव्या नेत्यांच्या प्रवेशामुळे जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असण्याच्या शक्यतेवर बोलताना जगताप म्हणाले, भाजपमध्ये पक्षश्रेष्ठींचा आदेश अंतिम असतो. आमच्या कार्यकर्त्यांवर कधीही अन्याय होऊ दिला जाणार नाही, आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी आहोत आणि त्या त्या वेळी त्यांना योग्य तो न्याय दिला जाईल. भाजपमध्ये सर्व्हेक्षण करूनच उमेदवारी दिली जाते, असेही त्यांनी स्पष्ट केले.एकडे भाजप विजयाचा दावा करत असतानाच, दुसरीकडे त्यांना रोखण्यासाठी शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला आहे.

### सह दुय्यम निबंधक कार्यालय बंद; नागरिकांची मोठी तारांबळ



गोंदिया : आज शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर रोजी सालेकसा येथील सह दुय्यम निबंधक कार्यालय सह दुय्यम निबंधक अधिकारी अनुपस्थित असल्याने अचानक बंद राहिले. त्यामुळे रजिस्ट्रीसाठी दूरदूरून आलेल्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. क्रिसमस डेची शासकीय सुट्टी असूनही आज कार्यालय सुरू राहील या अपेक्षेने अनेक नागरिक कार्यालयात दाखल झाले होते. मात्र सह दुय्यम निबंधक अधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचारी, संगणक ऑपरेटर कोणीही उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास कार्यालयाला कुलूप लावून वेळेपूर्वीच बंद करण्यात आले, असा आरोप नागरिकांनी केला आहे. यामुळे महत्त्वाच्या व्यवहारासाठी आलेल्या नागरिकांना परत माघारी जावे लागले. "अधिकारी अशा प्रकारे मनमानी करत असतील तर त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही?" असा संताप नागरिकांनी व्यक्त केला.या संदर्भात जिल्हा दुय्यम निबंधक अधिकारी के. एस. कांबळे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, संबंधित सह दुय्यम निबंधक अधिकारी रजेवर गेले असले तरी त्यांनी कोणत्याही प्रकारचा रजा अर्ज सादर केलेला नाही. अशी माहिती त्यांनी दिली.

अचानक कार्यालय बंद ठेवल्याने नागरिकांचे आर्थिक व वेळेचे नुकसान झाले असून संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भिवंडीत ठाकरेंचा पॅटर्न ठरला: पहिल्यांदाच सर्व ९० जागांवर लढणार

### शिवसेना शिंदे गटाला ठरणार मोठे आव्हान



दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- महापालिकेच्या निवडणुकीवरून सध्या सत्ताधारी महायुती व विरोधी पक्षांमध्ये सुंदोपसुंदी माजली आहे. विशेषतः ठाकरे बंधूंनी मुंबईचा महापौर मराठीच होईल असे ठणकावून सांगत मुंबईतील मराठी जनतेला आपल्या मागे ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले आहे. त्यातच एमआयएमचे नेते वारीस पठाण यांनी मुंबईचा महापौर पठाण, शेख, सय्यद व अन्सारी का होऊ शकत नाही? असा सवाल करत रान अधिकच पेटवण्याचा प्रयत्न केला आहे.मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल घोषित होतील. यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर येथील सत्ता व महापौरपद स्वतःकडे राखण्यासाठी सत्ताधारी व विरोधकांत कुरघोडी रंगली आहे. या पार्श्वभूमीवर वारीस पठाण यांनी उपरोक्त सवाल केला आहे.वारीस पठाण म्हणाले, मुंबईचा महापौर पठाण, शेख, सय्यद, अन्सारी का होऊ शकत नाही? संविधानात तर समानता आहे ना? सर्वांना बरोबरीचा दर्जा, हे संविधानच वाचत नाहीत. यांना काही माहितीच नाही. यांचे केवळ एकच काम आहे. देशात द्वेष पसरवणे, मतांचे ध्रुविकरण करणे व मुस्लिमांना कोणत्याही पद्धतीने शिवीगाळ करणे. यांच्याकडे विकासाचा एकही मुद्दा नाही. यांना विकासासंदर्भात प्रश्न विचारला तर त्यांना उत्तर देता येणार नाही.

महाराष्ट्रात एवढे शेतकरी आत्महत्या करत आहेत, त्यांना पॅकेज केव्हा देणार? सरकारला प्रश्न विचारा. त्यांच्याकडे उत्तर नाही. महाराष्ट्रात भ्रष्टाचार वाढला. त्यावरही त्यांच्याकडे उ्तत्तर नाही. ठेकेदारांवर कोणतीही कारवाई होत नाही.

# मुंबईचा महापौर पठाण, शेख, सय्यद का होऊ शकत नाही ?

## एमआयएम नेत्याचा सवाल; मुंबईत ठाकरे गट व एमआयएमची छुपी युती - भाजप



दिव्य वतन /वृत्तसेवा


मुंबई- महापालिकेच्या निवडणुकीवरून सध्या सत्ताधारी महायुती व विरोधी पक्षांमध्ये सुंदोपसुंदी माजली आहे. विशेषतः ठाकरे बंधूंनी मुंबईचा महापौर मराठीच होईल असे ठणकावून सांगत मुंबईतील मराठी जनतेला आपल्या मागे ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले आहे. त्यातच एमआयएमचे नेते वारीस पठाण यांनी मुंबईचा महापौर पठाण, शेख, सय्यद व अन्सारी का होऊ शकत नाही? असा सवाल करत रान अधिकच पेटवण्याचा प्रयत्न केला आहे.

मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल घोषित होतील. यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर येथील सत्ता व महापौरपद स्वतःकडे राखण्यासाठी सत्ताधारी व विरोधकांत कुरघोडी रंगली आहे. या पार्श्वभूमीवर वारीस पठाण यांनी उपरोक्त सवाल केला आहे.वारीस पठाण म्हणाले, मुंबईचा महापौर पठाण, शेख, सय्यद, अन्सारी का होऊ शकत नाही? संविधानात तर समानता आहे ना? सर्वांना बरोबरीचा दर्जा, हे संविधानच वाचत नाहीत. यांना काही माहितीच नाही. यांचे केवळ एकच काम आहे. देशात द्वेष पसरवणे, मतांचे ध्रुविकरण करणे व मुस्लिमांना कोणत्याही पद्धतीने शिवीगाळ करणे. यांच्याकडे विकासाचा एकही मुद्दा नाही. यांना विकासासंदर्भात प्रश्न विचारला तर त्यांना उत्तर देता येणार नाही.

महाराष्ट्रात एवढे शेतकरी आत्महत्या करत आहेत, त्यांना पॅकेज केव्हा देणार? सरकारला प्रश्न विचारा. त्यांच्याकडे उत्तर नाही. महाराष्ट्रात भ्रष्टाचार वाढला. त्यावरही त्यांच्याकडे उ्तत्तर नाही. ठेकेदारांवर कोणतीही कारवाई होत नाही.

यांच्याकडे कोणत्याही प्रश्नाचे उत्त नाही. केवळ एकच गोष्ट ध्रुविकरण. मुंबईचा महापौर. जिसको मुंबई में रहना है, ये कहना है. अरे काय मुंबई कुणाच्या बापाची जहागीर आहे का? मुंबई सोडा म्हणणारे तुम्ही कोण? असा खडा सवाल वारीस पठाण यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना केला आहे.

दुसरीकडे, भाजपने वारीस पठाण यांच्या भूमिकेवर प्रतिक्रिया देत ठाकरे गट व एमआयएमची छुपी युती झाल्याचा आरोप केला आहे. भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये म्हणाले, उबाठा एमआयएम छुपी युती? मुंबई महापालिकेत पठाण, खान, कुरेशी, शेख, अन्सारी किंवा एखादी हिजाबधारी महिला महापौर होऊ शकते,

# गरिबों के सम्मान में, भाजपा पोंभूर्णा मैदान में - आ. सुधीर मुनगंटीवार

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पोंभूर्णा येथील घरकुल लाभार्थ्यांना 5 ब्रास मोफत रेती वाटपाचा शुभारंभ



दिव्य वतन /वृत्तसेवा

चंद्रपूर - राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पोंभूर्णा येथे ५ ब्रास मोफत रेती वाटप उपक्रमाचा शुभारंभ हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. शासनाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत प्रशासन आणि भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकत्रितपणे हा उपक्रम सुरू केला. घरकुल लाभार्थ्यांना प्रत्यक्ष दिलासा देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे नमूद करत "गरिबों के सम्मान में, भाजपा पोंभूर्णा मैदान में" असे प्रतिपादन आ. मुनगंटीवार यांनी केले.

पोंभूर्णा येथे मोफत रेती वाटप उपक्रमाचा शुभारंभ प्रसंगी भाजपा महिला प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, भाजपाचे तालुकाध्यक्ष हरीश ढवस,तहसीलदार मोहनीश शेलवटकर,सुलभाताई पिपरे, राहुल संतोषवार,विनोद देशमुख,ज्योतीताई बुरांडे, अजित मंगळगिरीवार,अजय मस्के, रोशन ठेंगणे, बंडु बुरांडे,जितू चुदरी, रवी गेडाम,रवी मरपल्लीवार, जनार्दन सातपुते, राकेश गव्हारे, धनराज सातपुते आदिंची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आमदार मुनगंटीवार म्हणाले की, घरकुल लाभार्थ्यांना मदत करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून, ही प्रत्येक सच्च्या भाजप कार्यकर्त्याची सामाजिक बांधिलकी आहे. गरिबांच्या सेवेतूनच खरी लोकसेवा घडते. "गरिबों के सम्मान में, भाजपा मैदान में" या भावनेतून कार्यकर्त्यांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. गरीब कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी हातभार लावला पाहिजे, हीच खरी सेवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमात पोंभूर्णा तहसीलदार आणि त्यांच्या संपूर्ण कर्मचारी यांनी दाखवलेली तत्परता आणि भाजप पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी दाखवलेला सेवाभाव कौतुकास्पद असल्याचे नमूद करत आमदार मुनगंटीवार यांनी समाधान व्यक्त केले. गरीबांच्या सुख-समृद्धीसाठी प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळते, हीच खरी प्रेरणा असल्याचे ते म्हणाले. आजपासून सुरू झालेला हा उपक्रम अनेक कुटुंबांच्या घरकुलाचे स्वप्न साकार करण्यास निश्चितच मदत करेल, असा विश्वास आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. २०२५ मध्ये सुरू झालेली ही उपयुक्त वाटचाल, २०२६ मध्ये गोरगरिबांच्या हक्कांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी भक्कम पायाभूत ठरेल," असे सांगत आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, पुढील काळातही प्रत्येक गरजू लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचण्यासाठी कार्यकर्ते आणि प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने, एकदिलाने काम सुरू ठेवावे. त्यामुळे शासननिर्णयांचा खरा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# मनसेचे मुंबईतील उमेदवार ठरले: बाळा नांदगावकर, सरदेसाई बंद लिफाफा घेऊन राज ठाकरेंच्या घरी; उद्यापासून एबी फॉर्मचे वाटप



दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मुंबईतील आपल्या उमेदवारांची नावे फायनल केली आहेत. उमेदवारांच्या नावांचा बंद लिफाफा घेऊन मनसे नेते बाळा नांदगावकर व नितीन सरदेसाई राज ठाकरे यांच्या घरी पोहोचलेत. सूत्रांच्या माहितीनुसार, मनसे उद्यापासून आपल्या एबी फॉर्मचे वाटप करेल. त्यानंतर लगेचच उमेदवार अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करतील. तसे संदेशही मनसेतर्फे आपल्या कार्यकर्त्यांना गेलेत.

मनसे व ठाकरे गटाच्या नेत्यांची एक महत्त्वाची बैठक आज सकाळपासून सुरू होती. या बैठकीत मुंबईतील जागावाटप व उमेदवारांची नावे जवळपास फायनल झाल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीनंतर मनसे नेते नितीन सरदेसाई व बाळा नांदगावकर हे दोन्ही नेते एक बंद लिफाफा घेऊन राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी दाखल झालेत. या बंद लिफाफ्यात मनसे उमेदवाराची यादी असल्याचा दावा केला जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मनसे आज रात्रीपासूनच आपल्या उमेदवारांना योग्य ते संदेश पाठवेल. त्यानंतर उद्या सकाळपासून सर्व उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले जाईल. तूर्त राज ठाकरे यांच्या भेटीनंतर मनसेच्या उमेदवारांच्या नावांवर शेवटचा हात फिरवला जाईल.दुसरीकडे, ठाकरे गटासोबतच्या जागावाटपाच्या चर्चेत दादर वॉर्ड कर्मांक 192 ची जागा मनसेला सुटल्याची माहिती समोर आली आहे. या ठिकाणी मनसे नेते यशवंत किल्लेदार निवडणुकीच्या रिंगणात उतरतील अशी माहिती आहे. 2017 च्या निवडणुकीत या वॉर्डातून ठाकरे गटाच्या प्रती पाटणकर विजयी झाल्या होत्या. पण आता वाटाघाटीत हा वॉर्ड मनसेच्या ताब्यात घेतल्यामुळे ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची निराशा झाली आहे.ठाकरे गटाचे स्थानिक पदाधिकारी याविषयी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन आपली नाराजी व्यक्त करणार आहेत. यात माजी नगरसेवक प्रकाश पाटणकर यांचाही समावेश आहे.दुसरीकडे, सत्ताधारी भाजप व शिवसेनेचे जागावाटप उद्या होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ही घोषणा केली जाईल. या प्रकरणी आज रात्री शिवसेना समन्वय समितीच्या नेत्यांची एक बैठक एकनाथ शिंदे यांच्यासोबत होईल. या बैठकीत शिवसेनेच्या वाट्याला येणाऱ्या जागांवरील उमेदवार निश्चित केले जातील. त्यानंतर या उमेदवारांना उद्यापासूनच एबी फॉर्मचे वाटप केले जाण्याची शक्यता आहे. पक्षातील संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी उमेदवारी शेवटच्या क्षणी जाहीर केली जाणार असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी राज्य व केंद्रातील भाजप सरकारवर सडकून टीका केली. निवडणुकीच्या तोंडावर आमच्या उमेदवारांवर गुन्हे दाखल करण्याचा व मारहाण झाल्याचा प्रयत्न झाला. आज तुमची सत्ता आहे म्हणून तुम्हाला मस्ती आली आहे. आज तुमचा दिवस आहे. उद्या आमचा येील. इथे कुणाच्याही बापाची कायमस्वरुपी सत्ता नाही. सत्तेचा मुकूट कायम बदलत असतो हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे, असे ते म्हणाले.

## महत्त्वाचे...

### भुसावल नागपुर मेमोट्रेन सुरु करा ; श्रींच्या भक्तांची मागणी



शेगांव - रेल्वेस्थानक भुसावल ते नागपूर दरम्यान महत्त्वाचे रेल्वेस्थानक असल्यामुळे भुसावल ते नागपूर मेमोट्रेन व अमरावती ते सुरत एक्सप्रेस नियमित सुरू करण्याची मागणी
मा श्री. अश्विनजी वैष्णव केंद्रीय रेल्वेमंत्री नवी दिल्ली. मार्फत मा.स्टेशन प्रबंधक मध्य रेल्वे स्टेशन शेगांव. यांच्याकडे दि.25 डिसेंबर 2025 रोजी नम्र निवेदनद्वारे करण्यात आली आहे. विदर्भाची प्रतिपंढरी संत गजानन महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या संतनगरी शेगांव देशभरातून हजारो श्रींचे भाविकभक्त शहरात नियमित हजारोच्या संख्येने श्रीचरणी नतमस्तक होतात. त्यामुळे भुसावल नागपुर मेमो ट्रेन,अमरावती सुरत एक्सप्रेस नियमित सुरू केल्यास सर्व नागरिकांच्या सोयीचे होईल . रेल्वे प्रशासनाला उत्पन्नात आणखी भर पडेल सर्वांचे सोईचे होईल. विशेष म्हणजे शेगांव रेल्वे स्थानकाचा अमृत भारत स्टेशन योजनेत समावेश करण्यात आला आहे. अशी मागणीचे निवेदनावर अनंता माळी दत्ता तायडे विनोद शिंदे किसन चंदनगोळे बाळु वाकोडे देवलाल वाकोडे विश्वंभर चिंचोले प्रकाश उन्हाळे अजय बावणे गजानन धुमाळे कैलास अमृतकर यासह श्रींच्या भाविकभक्तांच्या सहीसाक्षर आहेत.

### डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती महोत्सवाचे आयोजन !



नांदुरा : श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्थानिक श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात कृषिरत्न भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती महोत्सवाला सुरुवात झाली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा 127 वा जयंती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. त्यासाठी महाविद्यालयात 25 डिसेंबर ते 27 डिसेंबर दरम्यान विविध सांस्कृतिक आणि पारंपारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तीन दिवसीय जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

### लेखक अंकुश शिंगाडे यांचा सत्कार



अक्षरक्रांती व कलागौरव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भातील ज्येष्ठ व बहुप्रसिद्ध लेखक अंकुश रामचंद्र शिंगाडे यांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला आहे. साहित्य क्षेत्रात शंभरहून अधिक पुस्तके प्रकाशित करून त्यांनी केलेले योगदान उल्लेखनीय व प्रेरणादायी असल्याने या सत्काराचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.अंकुश शिंगाडे यांनी विविध साहित्यप्रकारांमध्ये लेखन करून विदर्भाच्या साहित्यविश्वात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या दीर्घकालीन साहित्यसेवेबद्दल साहित्यप्रेमी व अभ्यासकांमध्ये मोठा आदर व्यक्त केला जात आहे. या सत्काराबद्दल विदर्भातील अनेक नामवंत साहित्यिकांनी आनंद व्यक्त केला आहे. श्री गोपाल कडूकर, राजेश कुबडे, शंकर घोरसे, लिलाधर दवंडे, नास येवतीकर, खुशाल गुल्हाणे, ज्ञानेश्वर गायके, सुधीर पुंजे, रमेश बेलगे, राजेश माहुरकर आदी साहित्यिकांनी अंकुश शिंगाडे यांच्या साहित्यिक कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले असून, हा सत्कार योग्य वेळी झालेला सन्मान असल्याचे मत व्यक्त केले आहे.अक्षरक्रांती व कलागौरव प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे विदर्भातील साहित्य चळवळीला नवी ऊर्जा मिळेल, तसेच नवोदित लेखकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास साहित्यवर्तुळातून व्यक्त करण्यात येत आहे.

# बांगलादेशातील हिंदूंच्या नरसंहाराचा खामगावात तीव्र निषेध

## युवा हिंदू प्रतिष्ठानतर्फे केंद्र सरकारला मदतीचे साकडे

दिव्य वतन /प्रतिनिधी

खामगाव. - शेजारील राष्ट्र असलेल्या बांगलादेशात सध्या हिंदू अल्पसंख्याकांचे अस्तित्व धोक्यात आले असून, तिथे सुरू असलेला हिंसाचार हा माणुसकीला काळिमा फासणारा आहे. दिपूचंद्र दास या हिंदू युवकाची ज्या अमानुष पद्धतीने हत्या करण्यात आली, त्या घटनेने संपूर्ण जगभरातील हिंदू समाज व्यथित झाला आहे. या पीडित हिंदू बांधवांच्या रक्षणासाठी आणि केंद्र सरकारने या प्रकरणी तातडीने ठोस पावले उचलावीत, या मागणीसाठी आज 'सकल हिंदू समाज' आणि 'युवा हिंदू प्रतिष्ठान' खामगावच्या वतीने उपविभागीय अधिकारी (SDO) यांना एक सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

दिपूचंद्र दास हत्या: एक अमानवीय कृत्य
निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, बांगलादेशातील कट्टरपंथीयांनी दिपूचंद्र दास या निष्पाप युवकाला केवळ त्याच्या धार्मिक ओळखीमुळे विवस्त्र करून, झाडाला लटकवून आणि मजहबी घोषणाबाजी करत जिवंत जाळले. या क्रूर घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करून जगभरातील हिंदूंच्या भावना दुखवण्याचे काम झाले आहे. या घटनेमुळे खामगाव येथील हिंदू समाजात तीव्र शोक आणि संतापाची लाट असून, पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सकल हिंदू समाजाच्या केंद्र सरकारकडे प्रमुख मागण्या:
खामगाव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत भारत देशाचे महामहीम राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान, गृहमंत्री आणि परराष्ट्र मंत्री यांना पाठवलेल्या या निवेदनात खालील मागण्या मांडण्यात आल्या आहेत:
१. आंतरराष्ट्रीय स्तरावर हस्तक्षेप: बांगलादेशात दररोज हिंदूंची घरे जाळली जात आहेत आणि मंदिरांवर हल्ले होत आहेत. तिथे हिंदू सुरक्षित नसल्यामुळे भारत सरकारने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला प्रभाव वापरून बांगलादेश सरकारवर दबाव निर्माण करावा आणि तिथल्या हिंदूंच्या सुरक्षेची हमी घ्यावी.
२. अवैध घुसखोरांवर कडक कारवाई: भारतात अवैध मार्गाने वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी घुसखोरांमुळे देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. या घुसखोरांना तात्काळ शोधून काढून त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्यासाठी (Deportation) केंद्र सरकारने युद्धपातळीवर यंत्रणा राबवावी.
३. हिंदूंचे रक्षण ही प्राथमिकता: जगातील हिंदूंचे एकमेव आश्रयस्थान असलेल्या भारत देशाकडून तिथल्या हिंदूंच्या मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने केवळ राजनैतिक निषेध न नोंदवता, तिथल्या हिंदूंच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी सर्व शक्य मार्ग (प्रसंगी सुरक्षा दलाची मदत) वापरावेत.
४. मारेकऱ्यांना शासन: दिपूचंद्र दास यांच्या मारेकऱ्यांना आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा होईल, यासाठी भारताने परराष्ट्र स्तरावर पाठपुरावा करावा.

खामगावच्या हिंदू समाजाचे कळकळीचे आवाहन
आज सकाळी ११ वाजता



टॉवर चौक परिसरात जमलेल्या शेकडो हिंदू बांधवांनी शांततेत मात्र आक्रमकपणे आपला निषेध नोंदवला. "आज बांगलादेशातील आमचा हिंदू भाऊ रक्ताच्या अश्रूंनी रडत आहे, त्याच्या घरादाराची राखरांगोळी होत आहे. अशा वेळी भारताने पुढाकार घेऊन त्यांना आधार द्यावा," अशी कळकळीची विनंती केंद्र सरकारला करण्यात आली. यावेळी सकल हिंदू समाज आणि युवा हिंदू प्रतिष्ठानचे पदाधिकारी, खामगाव शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, व्यापारी आणि मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते. केंद्र सरकार या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन हिंदूंचे रक्षण करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# भरधाव ट्रकच्या धडकेत चालक जागीच ठार

## समृद्धी महामार्गावरील सावळी येथील घटना

दिव्य वतन /प्रतिनिधी

बुलढाणा : टायर मधील हवा तपासण्यासाठी वाहनातून खाली उतरलेल्या चालकास पाठीमागून भरधाव येणाऱ्या ट्रकने जबर धडक दिली. या अपघातात सावळी येथील चाळीस वर्षीय चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. ही घटना समृद्धी महामार्गावर आज २५ डिसेंबर रोजी पहाटे साडे तीन वाजेच्या सुमारास घडली. या घटनेमुळे धाडसह सावळी गावात शोककळा पसरली आहे. विठ्ठल वाघ असे अपघातात ठार झालेल्या चालकाचे नाव आहे.

येथून जवळच असलेल्या सावळी येथील रहिवासी विठ्ठल पाटीलबा वाघ (वय ४०) यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. वडिलांच्या नावावर असलेल्या तीन एकर शेतीमध्ये तीन भावांचा हिस्सा असल्यामुळे विठ्ठल यांच्या वाट्याला केवळ एक एकर शेती आली. कमी शेतीत कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य असल्याने त्याने खाजगी कंपनीकडून कर्ज काढून एमएच ०४ जेके ९४१६ या क्रमांकाची आयशर गाडी घेतली होती. शेतीला जोडधंदा म्हणून तो वाहतुकीचा व्यवसाय करून आपल्या संसाराचा गाडा ओढत होता. दरम्यान, २४ डिसेंबर रोजी विठ्ठल वाघ हे कोपरगाव येथून रिकाम्या बाटल्यांचे भाडे घेऊन नागपूरच्या दिशेने जात होता. आज २५ डिसेंबरच्या पहाटे साडे तीन वाजेच्या सुमारास कारंजा लाड पोलिस स्टेशनच्या हद्दीतील टोल नाक्याच्या अलीकडे त्यांनी आपली गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली आणि गाडीच्या टायरमधील हवा तपासण्यासाठी तो खाली उतरला.

त्याच वेळी पाठीमागून येणाऱ्या एमएच १४ एच यू ७३९५ या क्रमांकाच्या भरधाव ट्रकने विठ्ठलला जबर धडक दिली. दोन वाहनांच्या मध्ये चिरडल्या गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात



धडक देणाऱ्या वाहनाचा चालक संतोषसिंग याचाही मृत्यू झाला असून सहचालक अनिकेत सिंग गंभीर जखमी झाला आहे.

मृतक विठ्ठल वाघ हा केवळ एक चालक नव्हता तर तो एक संवेदनशील सामाजिक कार्यात अग्रेसर देखील होता. समाजातील प्रत्येक घटकासोबत त्याचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याने धाड परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# रब्बी हंगाम ई-पीक पाहणीस प्रारंभ; शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन; २४ जानेवारीपर्यंत मुदत

## नोंदणीअभावी पीक विमा व अनुदानास अडचणी

दिव्य वतन /प्रतिनिधी

बुलढाणा : यंदाच्या रब्बी हंगाम ई-पीक पाहणी उपक्रमाची सुरुवात १० डिसेंबरपासून करण्यात आली असून, या अंतर्गत शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ उताऱ्यावर पीक पेरा स्वतः अँड्रॉईड मोबाईलद्वारे नोंदवणे बंधनकारक आहे.

शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणीची अंतिम मुदत २४ जानेवारी २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. रब्बी हंगाम २०२५ ई-पीक पाहणी अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजपर्यंत ३४,७४३.७१ हेक्टर क्षेत्रावर पीक नोंद झाली असून, एकूण ७,९९,१९५ मालक प्लॉटपैकी ३१,००२ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी डीसीएस व्हर्जन 4.0.5 या मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी केली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात केवळ १५.२९ टक्के क्षेत्रावरच ई-पीक पाहणीची नोंदणी पूर्ण झाली असून, उर्वरित क्षेत्रावर अद्याप नोंदणी होणे बाकी आहे. ई-पीक पाहणीसाठी अँड्रॉईड मोबाईल आवश्यक असून, शेतकऱ्यांनी गुगल क्रोम अपडेट करून ई-पीक पाहणी व्हर्जन 4.0.5 ॲप मोबाईलमध्ये इन्स्टॉल करावे. शेत बांधावर जाऊन प्रत्यक्ष पीक स्थितीची नोंद करून माहिती अपलोड करणे अपेक्षित आहे. ज्या शेतकऱ्यांकडे मोबाईल उपलब्ध नाही किंवा ॲप हाताळण्यात अडचण येत आहे, त्यांनी संबंधित गावचे तलाठी, कोतवाल, डी सीएस साठी नियुक्त सहाय्यक, तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) यांची मदत घेऊन आपल्या पिकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ई-पीक पाहणीद्वारे पीक नोंदणी न केल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर पीक पेरा कोरा राहणार असून, नंतर तो भरता येणार नाही. त्यामुळे पीक विमा, शासकीय अनुदाने व विविध लाभ मिळविताना अडचणी निर्माण होऊ शकतात. विशेषतः अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास पीक विमा मिळण्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे अत्यावश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, सर्व शेतकरी बांधवांनी २४ जानेवारी २०२६ पूर्वी अनिवार्यपणे आपल्या पिकांची ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# नायलॉन मांजाविरोधात कठोर दंडात्मक कारवाई प्रस्तावित

## उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाची सार्वजनिक सूचना जारी

दिव्य वतन /प्रतिनिधी



बुलढाणा : नायलॉन मांजाच्या वाढत्या वापरामुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कडक भूमिका घेतली आहे. न्यायालयाने सुमोटो जनहित याचिकेमधील २४ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नायलॉन मांजाच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी पुन्हा एकदा कठोर निर्देश दिले असून, त्यानुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून सर्वसामान्य जनतेसाठी सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे. सन २०२१ पासून नायलॉन मांजावर बंदी असूनही प्रत्यक्षात फारसा बदल झालेला नाही. आजही सर्रासपणे नायलॉन मांजाचा वापर सुरू असल्याने दरवर्षी अनेक नागरिक जखमी होत आहेत, तर काहींना जीवही गमवावा लागत आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. नायलॉन मांजाचा वापर करणारे तसेच त्याची विक्री करणारे विक्रेते बंदीबाबतच्या नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, न्यायालयीन आदेशांची व्यापक प्रसिद्धी प्रमुख वृत्तपत्रांतून झालेली असल्याने, या धोकादायक मांजाच्या परिणामांबाबत सर्वांना माहिती आहे. या पार्श्वभूमीवर, मा. उच्च न्यायालयाने कठोर कारवाईपूर्वी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या वतीने सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे. या सूचनेनुसार, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्याच्या पालकांना ५० हजार रुपयांचा दंड न्यायालयात जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्या व्यक्तीला न्यायालयात ५० हजार रुपयांचा दंड जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, तसेच नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या विक्रेत्याकडून साठा जप्त झाल्यास, प्रत्येक उल्लंघनासाठी न्यायालयात २ लाख ५० हजार रुपयांचा दंड जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, अशा सूचना जारी करण्यात आल्या आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ जानेवारी २०२६ रोजी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे होणार आहे.

ज्यांना प्रस्तावित कारवाईविरोधात निवेदन सादर करायचे आहे, त्यांनी सुनावणीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सुनावणीदरम्यान कोणीही हजर न राहिल्यास किंवा निवेदन न सादर केल्यास, नायलॉन मांजाच्या वापरकर्त्यांकडून व विक्रेत्यांकडून दंड वसूल करण्यास सर्वसामान्य जनतेचा कोणताही आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल, असेही सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे या प्रस्तावित कारवाई संदर्भात निवेदन किंवा आक्षेप असल्यास सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# इंडियन मेडिकल असोसिएशन, सावनेर तर्फे हास्य कवी सम्मेलन हास्यरंग- २०२५ चे यशस्वी आयोजन

दिव्य वतन /अनिल अडकिने

सावनेर - इंडियन मेडिकल असोसिएशन , सावनेर शाखेच्या वतीने २५ डिसेंबर २०२५ ला "हास्यरंग- २०२५" हे अशे बहारदार हास्यकवी संमेलन आयोजित करण्यात आले. दैनंदिन वैद्यकीय सेवेत व्यस्त असलेल्या डॉक्टरांना व त्यांच्या कुटुंबियांना मनमुराद हास्याचा डोज देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आय. एम. ए. सावनेर शाखेचे अध्यक्ष डॉ. परेश झोपे यांची उपस्थिती लाभली. हास्यकवी संमेलनात हास्यकवी श्री. गौतम गुडधे, श्री. संजय कावरे, श्री. गजानन मते, श्री. गोपाल मापारी आणि डॉ. स्वप्नील मानकर यांनी आपल्या खुसखुशीत कविता, विनोदी अनुभव व सामाजिक आशय असलेल्या रचनांद्वारे प्रेक्षकांना अक्षरशः खळखळून हसवले. त्यांच्या प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांकडून जोरदार टाळ्यांची दाद मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयएमचे सचिव डॉ. प्रविण चव्हाण यांनी केले , तर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मोठ्या संख्येने आयएमचे सदस्य डॉ. स्मिता भूडे (उपाध्यक्ष) डॉ. शिवम पुनियानी (कोषाध्यक्ष),





डॉ. विजय धोटे , डॉ. ज्योत्स्ना धोटे, डॉ. विजय घटे, सौ. नंदा घटे, डॉ. चंद्रकांत मानकर, सौ. रजनी मानकर, डॉ. विनोद बोकडे, डॉ. करुणा बोकडे, डॉ. निलेश कुंभारे, डॉ. सोनाली कुंभारे, डॉ. उमेश जिवतोडे, डॉ. आशीष चांडक, डॉ. रेणुका चांडक, डॉ. विलास मानकर, डॉ. गौरी मानकर, डॉ. सचिन घटे, सौ. मीनल घटे, डॉ. गुंजन धुंदेले, डॉ. तनू धुंदेले, डॉ. अमित चेडे, सौ. दुर्गा चेडे, डॉ. नितीन पोटोडे, डॉ. मोनाली पोटोडे, सौ. चित्रा झोपे, श्री. सतीश भुडे आणि आणि मोठ्या प्रमाणात कुटुंबीय उपस्थित होते.



आय. एम. ए. सावनेर शाखेच्या या सांस्कृतिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



# राष्ट्रीय महामार्गावरील पांडव नदीवर रस्ता आतून पोखरला

## मोठ्या दुर्घटनेची शक्यता, राष्ट्रीय महामार्गावर जीवघेणा सापळा

दिव्य वतन /प्रतिनिधी

जळगाव - वरवट बकाल ते जळगाव जामोद या राष्ट्रीय महामार्गावरील पांडव नदीच्या पुलाजवळ रस्त्याच्या कडेला खोल कपार पडले आहे. त्यामुळे हा रस्ता वरून मजबूत दिसत असला तरी आतून पूर्णपणे पोखरला आहे. विशेषता वरवट बकाल ते संग्रामपूर दरम्यानचा हा रस्ता अपघाताचा हॉट स्पॉट बनला आहे. या धोकादायक ठिकाणी यापुर्वी किरकोळ अपघाताच्या घटना सुध्दा घडल्या आहेत. परंतु सुदैवाने जीवितहानी झाली नाही. परंतु या ठिकाणी कोणत्याही क्षणी मोठी अपघाताची घटना घडू शकते, अशी भीती नागरिक व प्रवाशांमध्ये निर्माण झाली आहे.

मागील २०२३ मध्ये झालेल्या महापुरात हा रस्ता मोठ्या प्रमाणावर खचून गेला होता. तेव्हापासून आजपर्यंत संबंधित विभागाने या रस्त्याची दुरुस्ती केली नाही. सततची वाहतूक, अवजड वाहने आणि आतून रस्त्याला झालेला कपार यामुळे रस्ता दिवसेंदिवस हा रस्ता अधिक धोकादायक ठरत आहे. समोरून येणाऱ्या वाहनांना साइड देताना एखादे वाहन या कपारलेल्या भागावर गेल्यास डांबराचा थर तसाच दिसूनही आतून रिकामा झाला असल्याने वाहन कोसळण्याचा किंवा उलटण्याचा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याकडे होणारे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष स्थानिक नागरिकांच्या रोषाचे कारण ठरत आहे. संबंधित विभाग हा मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहेत का, असा प्रश्न प्रवासी वर्गाकडून उपस्थित केला जात आहे. रस्त्याची गंभीरता लक्षात घेऊन वरवट बकाल येथील काही जागरूक नागरिकांनी स्वताच पुढाकार घेत कपारलेल्या ठिकाणी दगड टाकून, चुना पसरवून तात्पुरती दिशा सूचना केली. तसेच त्या ठिकाणी बेशरम ची झाडे लावून निषेधही नोंदवला.

विशेष म्हणजे या मार्गाने दररोज शेकडो विद्यार्थी, प्रवासी, व्यावसायिक, लोकप्रतिनिधी व अधिकारी ये जा करतात. तरीही प्रशासनाचे या ठिकाणाकडे सातत्याने दुर्लक्ष सुरूच आहे. प्रवासी व नागरिकांनी पांडव नदी पुलाजवळील पोखरलेला रस्ता युद्धपातळीवर दुरुस्त करावा, अशी मागणी होत आहे.

**रस्त्यावर कधीही मोठा अपघात होऊ शकतो**

**या ठिकाणी रस्ता वरून ठीक दिसतो. परंतु अवजड वाहन गेल्यानंतर रस्ता खाली खचतो. त्यामुळे दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्याचे काम सुरू करावे.**

# दुसरा आंतरराष्ट्रीय फुले महोत्सव पुणे साठी कवयित्री सौ वसुधा रामकृष्ण येनकर नागपूर यांची निवड

दिव्य वतन /प्रतिनिधी



नागपूर : क्रांती सूर्य महात्मा जोतीराव फुले क्रांती ज्योती सावित्रीआई फुले यांच्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाचा प्रचार प्रसार व्हावा व देशातील पहिली मुलींची शाळा भिडे वाड्यात सुरू झाली त्याचा इतिहास जतन व्हावा म्हणून २ जानेवारी ते ५ जानेवारी २०२६ असा चार दिवसीय भव्य आंतरराष्ट्रीय महोत्सव आयोजीत करण्यात आला आहे. या अंतर्गत आयोजित काव्य महोत्सवात फुले प्रेमी, सामाजिक कार्यकर्त्या कवयित्री सौ वसुधा रामकृष्ण येनकर नागपूर यांची कविता सादर करण्यासाठी व अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. यासाठी त्यांचे सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

त्याच बरोबर या आंतरराष्ट्रीय महोत्सवाच्या निमित्ताने महात्मा फुले आणि सावित्रीआई फुले यांच्या जीवनावर आधारित शालेय विद्यार्थ्यांना एकपात्री प्रयोग, नाट्य छटा, पोवाडा, नृत्य इ. सादर करण्याची संधी प्राप्त झाली आहे. तसेच महिला सक्षमीकरणासाठी लाठीकाठी-दांडपट्टा यांचे प्रात्यक्षिक असे विविध उपक्रम होणार आहेत. हा महोत्सव श्री विजय वडवेराव यांच्या सक्षम नेतृत्वात एस एम जोशी सोशालीस्ट फाऊंडेशन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

## महत्त्वाचे...



### स्पेनची जैमा हिमालय स्वच्छ करत आहे

देहरादून/चमोली- सात समुद्रापारून आलेली एक युरोपियन मुलगी उत्तराखंडचे पर्वत स्वच्छ करत आहे. स्पेनची रहिवासी जैमा कोलिल व्यवसायाने ग्राफिक डिझायनर आहे, पण आज तिची खरी ओळख हिमालयाची शिखरे स्वच्छ करणारी मुलगी म्हणून झाली आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी जैमा भारतात ट्रेकिंगसाठी आली होती. पण शिखरांवर पसरलेल्या घाणीने तिला हादरवून सोडले. यानंतर तिने उत्तराखंडला आपले घर बनवले आणि ते युद्ध सुरू केले, जे खरेतर आपल्याला लढायला हवे होते. जैमा कोलिलने संवादादरम्यान सांगितले की ती व्यवसायाने ग्राफिक डिझायनर आहे, पण तिला पर्वत आणि योगाची विशेष आवड आहे. जैमा कोलिल म्हणाली की, सध्या मी उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील लोहाजंग गावात एका होम-स्टेमध्ये राहते. काही वर्षांपूर्वी जेव्हा मी पहिल्यांदा भारतात आले, तेव्हा मी ऋषिकेशमधील एका आश्रमात योग शिकले. हा माझ्यासाठी पूर्णपणे वेगळा अनुभव होता. पण खरे आव्हान तेव्हा मिळाले जेव्हा मी नेपाळमधील अन्नपूर्णा ट्रॅकवर गेले.तेव्हा जाणवले की हिमालयाच्या तुलनेत स्पेनमधील डोंगर काहीच नाहीत. कारण तिथला सर्वात उंच डोंगरही फक्त 3,000 मीटर उंच आहे.

### राबडी निवासस्थान रिकामे होऊ लागले...



बिहारमधील राबडी निवासस्थानातून सामानाची हलवाहलव सुरू झाली आहे. गुरुवारी रात्री 4 ते 5 लहान गाड्या पाटण्यातील 10 सर्कुलर रोडवरील सरकारी निवासस्थानी (राबडी निवासस्थान) पोहोचल्या. या गाड्यांमधून सामान गोला रोडवरील गोशाळेत हलवण्यात आले. यानंतर ते दुसऱ्या ठिकाणी पाठवले जाईल.रात्रीच्या अंधारात राबडी निवासस्थानी पोहोचलेल्या लहान गाड्यांमधून रोपे आणि बागेतील इतर सामान काढतानाची छायाचित्रे समोर आली आहेत. ही हलवाहलव अशा वेळी होत आहे, जेव्हा आरजेडी प्रमुख लालू प्रसाद यादव दिल्लीत आहेत. तेजस्वीही बाहेर आहेत. घरात कोणताही पुरुष सदस्य नाही. मात्र, आरजेडीकडून सध्या सामान हलवण्याबाबत कोणतीही पुष्टी करण्यात आलेली नाही.1 महिन्यापूर्वी राबडी निवासस्थान रिकामे करण्याची नोटीस मिळाली होती20 वर्षांनंतर लालू कुटुंबाला सरकारी निवासस्थान (राबडी निवासस्थान) रिकामे करण्याची नोटीस मिळाली आहे. एक महिन्यापूर्वी 25 नोव्हेंबर रोजी बिहार भवन निर्माण विभागाने ही नोटीस पाठवली होती.इमारत बांधकाम विभागाने जारी केलेल्या आदेशात म्हटले होते की, बिहार विधान परिषदेतील विरोधी पक्षनेत्यासाठी पाटणा मध्यवर्ती पुलावरील निवासस्थान क्रमांक 39, हार्डिंग रोड, वाटप करण्यात आले आहे. सूत्रांनुसार, राबडी निवासस्थान रिकामे करण्याची प्रक्रिया गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. सर्व सामान हळूहळू महुआ बाग आणि आर्य समाज रोड येथील निवासस्थानी हलवले जात आहे. हे निवासस्थान टप्प्याटप्प्याने रिकामे केले जात आहे. एक महिन्यापूर्वी निवासस्थान रिकामे करण्यासंदर्भात मिळालेल्या नोटीसवर लालू कुटुंब एकवटलेले दिसले होते. तेजप्रताप यादव यांनी सोशल मीडियावर लिहिले- 'धाकट्या भावाने मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि मोठ्या भावाच्या बंगल्याला रिकामे करण्याचा आदेश दिला. लालूजी आणि त्यांचे कुटुंब आता 10 सर्कुलर रोडच्या बंगल्यात राहणार नाही.

# महापालिका निवडणुकीआधी राष्ट्रवादीचा मास्टरप्लॅन

## कोल्हे, रोहित पवारांच्या उपस्थितीने लक्ष वेधले; गुप्त बैठकीनंतर चर्चांना उधाण

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुका जवळ येत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये हालचालींना वेग आला आहे. शरद पवार गट आणि अजित पवार गटातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वाची, पण गुप्त स्वरूपाची बैठक नुकतीच पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेवर प्राथमिक पातळीवर सकारात्मक चर्चा झाल्याचं समजत आहे. विशेष म्हणजे, या बैठकीची माहिती बाहेर येताच पिंपरी-चिंचवडच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, येत्या महापालिका निवडणुकीत राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या बैठकीबाबत माहिती देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी महत्त्वाचा खुलासा केला. अजित पवार यांच्या सूचनेनुसारच ही बैठक आयोजित करण्यात आल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. या बैठकीत प्रामुख्याने जागावाटपाचा गुंतागुंतीचा प्रश्न कसा सोडवता येईल, यावर सविस्तर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. निवडणुकीत दोन्ही गटांचे उमेदवार ज्या जागांवर विजय मिळवू शकतील, अशाच जागांवर योग्य उमेदवार देण्याबाबत सकारात्मक वातावरण असल्याचंही त्यांनी नमूद केलं. हा तिढा लवकरच सुटेल, असा विश्वास गव्हाणे यांनी व्यक्त केला आहे.

या महत्त्वाच्या बैठकीला शरद पवार गटाकडून खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार आणि पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे उपस्थित होते. तर अजित पवार गटाकडून स्वतः अजित गव्हाणे यांनी सहभाग घेतला होता. दोन्ही बाजूंनी अनुभवी आणि प्रभावी नेते उपस्थित असल्यामुळे ही बैठक केवळ औपचारिक नव्हे, तर आगामी रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत निर्णायक असल्याचं मानलं जात आहे. बैठकीदरम्यान स्थानिक राजकीय परिस्थिती, मतदारांचा कल, तसेच मागील



निवडणुकांचा अनुभव लक्षात घेऊन चर्चा करण्यात आली. या सगळ्या घडामोडी पाहता, पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा सत्तेसाठी एकत्र येण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचं चित्र स्पष्ट होत आहे.

दरम्यान, अजित गव्हाणे यांनी हेही स्पष्ट केलं की, अद्याप कोणताही अंतिम निर्णय किंवा ठोस फॉर्म्युला ठरलेला नाही. महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांनाही विश्वासात घेऊन पुढील वाटचाल करण्याचा प्रयत्न राहील, असं त्यांनी सांगितलं. अंतिम निर्णय हा वरिष्ठ नेत्यांच्या पातळीवरच घेतला जाईल, यावर त्यांनी भर दिला. दुसरीकडे, खासदार अमोल कोल्हे यांनी या बैठकीवर थेट भाष्य करणं टाळलं. त्यांनी ही बैठक मैत्रीपूर्ण स्वरूपाची होती, असं सांगत चर्चांवर मौन बाळगलं. मात्र, राजकारणात काहीही होऊ शकतं, असा सूचक इशारा देत त्यांनी भविष्यातील घडामोडींसाठी दार उघडं ठेवलं आहे.शहरात पुन्हा एकदा सत्ता स्थापन करण्याच्या उद्देशानेच या हालचाली सुरू असल्याचं स्पष्टपणे दिसून येत आहे. अजित गव्हाणे यांच्या माहितीनुसार, शिवसेना, मनसे तसेच इतर काही राजकीय पक्षही अजित पवार गटाच्या संपर्कात आहेत. विशेष म्हणजे, खासदार अमोल कोल्हे आणि आमदार रोहित पवार हे अजित पवार यांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी गेले असल्याची माहिती समोर आली आहे. या भेटीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या भविष्यातील भूमिकेबाबत सविस्तर चर्चा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. या सर्व घडामोडींमुळे पिंपरी-चिंचवड शहरात शरद पवार गट आणि अजित पवार गट पुन्हा एकत्र येण्याची शक्यता आता अधिकच बळावली असून, आगामी महापालिका निवडणूक चुरशीची ठरणार हे निश्चित मानलं जात आहे.

# प्रशांत जगताप अखेर काँग्रेसवासी

## हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह वरीष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पक्षाला रामराम ठोकत आज अधिकृतपणे काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. हर्षवर्धन सपकाळ आणि विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत टिळक भवन येथे झालेल्या या पक्षप्रवेशामुळे पुण्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी राजकीय उलथापालथ घडल्याचं स्पष्ट झालं आहे. पुणे महापालिका निवडणूक एकत्र लढवण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये सुरू असलेल्या हालचालींमुळे पक्षांतर्गत अस्वस्थता वाढली होती. गुप्त बैठका, नेत्यांच्या गाठीभेटी आणि पडद्यामागील चर्चा सुरू असतानाच या संभाव्य युतीला उघड विरोध करणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. त्यांच्या या निर्णयामुळे पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

राजीनामा जाहीर केल्यानंतर अवघ्या काही तासांतच प्रशांत जगताप यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत स्पष्ट चित्र समोर आलं. आज दुपारी पुण्यातील टिळक भवन येथे काँग्रेस पक्षात त्यांचा अधिकृत प्रवेश पार पडला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ त्रिष्ठ नेते विजय वडेट्ट ांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. राष्ट्रवादी काँग्रेसमधील धोरणात्मक भूमिकांबाबत नाराजी व्यक्त करणाऱ्या जगताप यांनी अखेर काँग्रेसमध्ये प्रवेश करत आपल्या राजकीय निर्णयावर शिक्कामोर्तब केलं. त्यांच्या प्रवेशामुळे पुण्यात काँग्रेसची ताकद वाढणार असल्याचं राजकीय जाणकारांकडून बोललं जात आहे.दरम्यान, काँग्रेसमध्ये प्रवेश होण्यापूर्वी प्रशांत जगताप यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडूनही पक्षप्रवेशाची ऑफर देण्यात आली होती. खुद्द उद्धव ठाकरे यांनी प्रशांत जगताप यांना फोन करून थेट संवाद साधल्याची माहिती समोर आली होती.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात चंद्रपूर महानगरपालिका निवडणूक होणार

### चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी रणनीती

### आखणीला वेग, आ.मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात मिळेल संघटनेला नवी ऊर्जा

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

चंद्रपूर - चंद्रपूर शहर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनात राबविण्यात येणार आहे. संघटन अधिक सुदृढ करणे आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रिया नियोजनबद्ध व प्रभावीपणे पार पाडणे या दृष्टीने प्रदेश भाजपकडून त्यांना महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यासंदर्भात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांनी अधिकृत नियुक्तीपत्र जाहीर करून या निर्णयाला अधोरेखित केले आहे. आमदार श्री. चैनसुखजी संचेती यांची निवडणूक निरीक्षक म्हणून, माजी खासदार अशोकजी नेते यांची निवडणूक प्रभारी म्हणून, तर आ.किशोर जोरगेवार यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी नियोजनबद्ध, समन्वयित आणि गतिमान अभियान उभारले जाणार आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने काम करणारे आ. सुधीर मुनगंटीवार हे या निवडणुकीचे प्रमुख प्रेरणास्त्रोत ठरणार आहेत. अफाट लोकसंपर्क, कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारे निर्णयक्षम नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. महानगरपालिका निवडणूक ही केवळ राजकीय



स्पर्धा नसून चंद्रपूरच्या पुढील पाच वर्षांच्या विकासआराखड्याचा पाया आहे, असा दूरदर्शी दृष्टिकोन त्यांनी मांडला असून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात संघटनेला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# ऑस्ट्रेलियासारखे भारतात मुलांसाठी सोशल मीडिया बंदी घालावी!

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मद्रास उच्च न्यायालयाने शुक्रवारी केंद्र सरकारला सूचना केली की, ऑस्ट्रेलियाप्रमाणे भारतातही 16 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालावी. यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले.

मदुराई खंडपीठाच्या विभागीय खंडपीठाचे न्यायमूर्ती जी. जयरामन आणि न्यायमूर्ती के. के. रामकृष्णन यांनी अल्पवयीन मुलांना ऑनलाइन पॉर्नोग्राफिक सामग्री सहज उपलब्ध होण्याच्या मुद्द्यावर दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान हे मत व्यक्त केले.

न्यायालयाने म्हटले की, इंटरनेट सेवा प्रदात्यांवर (ISP) अधिक कठोर नियम लागू केले जावेत. त्यांना अनिवार्यपणे पॅरेंटल विंडो सेवा (पॅरेंटल कंट्रोल) देण्यास सांगितले जावे, जेणेकरून पालक त्यांच्या मुलांच्या ऑनलाइन क्रियाकलापांना फिल्टर आणि नियंत्रित करू शकतील.




खरं तर, ऑस्ट्रेलियाने 9 डिसेंबरपासून 16 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खाते तयार करण्यावर बंदी घातली आहे. अशा प्रकारची बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश आहे.

हे प्रकरण एका जुन्या जनहित याचिकेशी संबंधित आहे, ज्यात तक्रार करण्यात आली होती की मुलांना इंटरनेटवर अश्लील आणि पोर्नोग्राफिक सामग्री खूप सहज मिळते. यावर प्रतिबंध घालण्यासाठी कोणतीही ठोस व्यवस्था नाही.याचिकेत मागणी करण्यात आली होती की राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (NCPCR), तामिळनाडू बाल हक्क आयोग आणि इंटरनेट सेवा प्रदात्यांना निर्देश देण्यात यावेत की त्यांनी पालकीय नियंत्रण प्रणाली (पैरेंटल कंट्रोल सिस्टम) लागू करावी आणि शाळा व समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी.जोपर्यंत नवीन कायदा बनत नाही, तोपर्यंत सरकार आणि आयोगाने जनजागृती मोहीम तीव्र करावी आणि मुलांना व पालकांना सुरक्षित इंटरनेट वापरण्याचे सोपे मार्ग समजावून सांगावे.

# एअर-प्युरिफायरवरील जीएसटी का कमी करू शकत नाही

## जेणेकरून सामान्य खरेदी करू शकतील, सध्या १५ हजार किंमत

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी एअर प्युरिफायरवरील वस्तू आणि सेवा कर (GST) 18% वरून 5% पर्यंत कमी करण्याच्या मागणीसाठी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी केली. यावेळी न्यायमूर्ती विकास महाजन आणि न्यायमूर्ती विनोद कुमार यांच्या खंडपीठाने केंद्राला विचारले की, एअर प्युरिफायरवरील GST का कमी करू शकत नाही.



उच्च न्यायालयाने सरकारला सांगितले- तुम्हाला जे काही करावे लागेल ते करा. सध्या एका एअर प्युरिफायरची किंमत 10-15 हजार रुपये आहे. GST ला अशा योग्य स्तरावर का आणले जात नाही, जिथे सामान्य माणूसही ते खरेदी करू शकेल.

तर, केंद्राच्या वतीने हजर झालेले अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (ASG) एन. वेंकटरमण यांनी याचिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. केंद्राने म्हटले- याचिकेत आरोग्य विभाग पक्षकारच नाही, तर एअर प्युरिफायरला वैद्यकीय उपकरण घोषित करण्याची मागणी केली जात आहे. GST परिषद असा निर्णय घेऊ शकत नाही.

यावर कोर्ट म्हणाले- जीएसटी कौन्सिलला निर्णय घेण्यास काय अडचण आहे? तुम्ही जे म्हणत आहात, तेच तेही म्हणू शकतात. यावर केंद्राने उत्तर दिले- या प्रकरणात संविधानाचा मुद्दा समाविष्ट आहे. नियमांनुसार यात लांब प्रक्रिया, परवाना आणि इतर औपचारिकता समाविष्ट आहेत. यामुळे अडचणींचा पिटारा उघडेल.

एअर प्युरिफायरवरील जीएसटी कमी करण्याची ही याचिका ॲडव्होकेट कपिल मदान यांनी दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, मेडिकल डिव्हाइस रूल्स आणि २०२० च्या केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार एअर प्युरिफायर "मेडिकल डिव्हाइस" च्या व्याख्येत येतात.

याचिकेत युक्तिवाद केला आहे की, जेव्हा बहुतेक मेडिकल डिव्हाइसवर ५% जीएसटी लागतो, तेव्हा एअर प्युरिफायरवर १८% जीएसटी योग्य नाही. याचिकाकर्त्याने WHO आणि आरोग्य मंत्रालयाच्या सल्ल्याचा हवाला देत म्हटले आहे की, एअर प्युरिफायरला लक्झरी मानून जास्त कर लावणे लोकांच्या आरोग्याच्या अधिकारावर अतिरिक्त भार टाकते.या संपूर्ण प्रकरणावर 24 डिसेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली होती. बुधवारी न्यायालयाने केंद्र सरकार आणि अधिकाऱ्यांना विचारले की, जेव्हा राजधानीतील हवेची स्थिती आणीबाणीसारखी झाली आहे, तेव्हा एअर प्युरिफायरवर 18% जीएसटी का लावला जात आहे.

न्यायालयाने म्हटले की, जर सरकार लोकांना स्वच्छ हवा उपलब्ध करून देऊ शकत नसेल तर किमान एअर प्युरिफायरवरील कर तरी कमी करावा. न्यायालयाने म्हटले की, प्रत्येक नागरिकाला स्वच्छ हवेत श्वास घेण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत एअर प्युरिफायरला चैनीची वस्तू मानून जीएसटी लावणे योग्य नाही.

जेव्हा सरकार स्वतः स्वच्छ हवा पुरवण्यात अपयशी ठरते, तेव्हा किमान एअर प्युरिफायरवर जीएसटी कमी करणे किंवा करात सूट देणे हे सर्वात मूलभूत पाऊल असू शकते.

# पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर धडक कारवाई; ८ टिप्पर जप्त

## १ कोटी ६२ लाखांचा मुद्देमाल ताब्यात ; ८ आरोपींवर गुन्हा दाखल

**दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी**

बुलढाणाः जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात प्रशासनाच्या धडक कारवाया सुरु आहेत. मलकापूर तालुक्यातील मौजा नरवेल परिसरातील पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ८ टिप्पर व १६ ब्रॉस वाळू जप्त करण्यात आली असून, एकूण अंदाजे १ कोटी ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. याप्रकरणी ८ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या आदेशानुसार आणि उपविभागीय अधिकारी मलकापूर संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व महसूल विभागाच्या संयुक्त पथकाने बुधवारी सायंकाळच्या सुमारास केली आहे. दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास, पोलीस स्टेशन एमआयडीसी मलकापूर हद्दीतील नरवेल कोटेश्वर मंदिर शिवार येथे पेट्रोलिंग सुरू असताना जमुनापुरी घाटातून मलकापूरकडे शासनाचा महसूल बुडवून अवैध वाळू वाहतूक होत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तहसीलदार व महसूल कर्मचाऱ्यांसह पंचांना सोबत घेऊन नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयास्पदरीत्या येणारी ८ टिप्पर वाहने थांबवून तपासणी केली असता, चालकांकडे वाळू वाहतुकीसाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचे आढळून आले.

पंचासमक्ष तपासणीमध्ये प्रत्येकी सुमारे २ ब्रॉस वाळू असे एकूण १६ ब्रॉस वाळू (अंदाजे किंमत २ लाख रुपये) तसेच प्रत्येकी अंदाजे २० लाख रुपये किमतीची ८ टिप्पर वाहने जप्त करण्यात आली. अशा प्रकारे वाळू व वाहनांसह १ कोटी ६२ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी पो.स्टे. एमआयडीसी दसरखेड भाग-०५, गुन्हा अप. क्र. १७५/२०२५ अन्वये कलम ३०३(२) भान्यासं सह कलम २१(१), २१(२) गौण खनिज अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये मलकापूर येथील ६ जण, नांदुरा आणि मोताळा येथील एका जणाचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या टिप्पर वाहनांचे क्रमांक



MH-28-BB-6174/ 2895/ 4414/ 4172/ 1210/ 8910/ 7935 / 7397 असे आहेत. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर कारवाई यापुढेही सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.



## सत्तासंघर्ष, प्रशासनाची कसोटी आणि जनतेचा हरवलेला विश्वास

महाराष्ट्र आज एका निर्णायक वळणावर उभा आहे. देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक नकाशावर अग्रस्थानी असलेले हे राज्य सध्या अनेक अंतर्गत विरोधाभासांना सामोरे जात आहे. एकीकडे विकासाचे दावे, गुंतवणुकीचे करार आणि पायाभूत सुविधांची जाहिरात सुरू असताना, दुसरीकडे सामान्य नागरिक मात्र महागाई, बेरोजगारी, शेतकरी संकट आणि प्रशासकीय मनमानीच्या ओझ्याखाली दबला आहे. राज्यातील आजच्या घडामोडी पाहता "प्रशासन जनतेसाठी की जनतेवर?" हा प्रश्न प्रकर्षाने पुढे येतो.

राजकीय पातळीवर महाराष्ट्र गेल्या काही वर्षांपासून अस्थिरतेत आहे. सत्तांतर, पक्षफुटी, गटबाजी आणि सत्तासमीकरणे यामुळे लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. निवडणुका म्हणजे लोकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी असते; मात्र प्रत्यक्षात त्या सत्तेच्या गणितापुरत्याच मर्यादित राहिल्याचे चित्र दिसते. शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक यांच्या प्रश्नांपेक्षा सत्ता कोणाच्या हातात राहणार, यावरच राजकारण केंद्रित झाल्याचा आरोप जनतेतून होत आहे. प्रशासनाची अवस्था ही राजकारणापेक्षा कमी चिंताजनक नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून मंत्रालयापर्यंत अनेक ठिकाणी गैरकारभार, आर्थिक अनियमितता आणि नियमबाह्य निर्णयांचे आरोप सातत्याने समोर येत आहेत. अंकेक्षण अहवाल, चौकशी समित्या आणि न्यायालयीन आदेश असूनही दोषींवर कारवाई होण्यास विलंब होत असल्याचे चित्र आहे. यामुळे "कायद्याचे राज्य" ही संकल्पना केवळ कागदापुरतीच उरली आहे का, असा सवाल उपस्थित होतो.

महाराष्ट्राचा शेतकरी आजही संकटात आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, पीक विम्याची अपुरी भरपाई, वाढता उत्पादन खर्च आणि हमीभावातील अनिश्चितता यामुळे शेती तोट्याचा व्यवसाय ठरत आहे. शासनाकडून विविध योजना जाहीर केल्या जातात; मात्र त्यांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहोचतेच असे नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते आकडे हे शासनाच्या दाव्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत. शेतीप्रधान राज्यात शेतकरी सुरक्षित नाही, ही बाब महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी आहे. महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. जीवनावश्यक वस्तू, इंधन, शिक्षण आणि आरोग्य सेवा या सर्वच गोष्टी महाग झाल्या आहेत. मध्यमवर्गीय कुटुंबांचे मासिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. उत्पन्न स्थिर असताना खर्च वाढत चालल्याने कर्जबाजारीपणा वाढत आहे. सरकारी सवलती आणि अनुदाने घोषणांपुरतीच मर्यादित राहतात, प्रत्यक्षात लाभ मिळवण्यासाठी नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. राज्यातील युवकांमध्ये वाढत चाललेली बेरोजगारी ही आणखी एक गंभीर समस्या आहे. शिक्षण पूर्ण करूनही नोकरीच्या संधी मर्यादित आहेत. शासकीय भरती प्रक्रिया रखडणे, परीक्षा वेळेवर न होणे, आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे तरुणांमध्ये असंतोष वाढत आहे. खासगी क्षेत्रातही नोकरीची असुरक्षितता आणि कमी वेतन यामुळे युवकांचे भवितव्य धोक्यात आले आहे. ही परिस्थिती सामाजिक अस्थैर्याला खतपाणी घालणारी ठरू शकते. शहरी भागात पायाभूत सुविधा, वाहतूक, घरभाडे आणि पर्यावरण यांचे प्रश्न गंभीर होत चालले आहेत. ग्रामीण भागात आरोग्य, शिक्षण आणि पाणीटंचाई यांसारख्या मूलभूत समस्यांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याची भावना आहे. विकासाचा लाभ काही मोजक्या घटकांपुरताच मर्यादित राहतो आहे, तर बहुसंख्य जनता संघर्ष करत आहे. आज महाराष्ट्राला गरज आहे ती केवळ घोषणांची नव्हे, तर जबाबदार आणि पारदर्शक प्रशासनाची. राजकारणाने सत्तेपेक्षा जनहिताला प्राधान्य दिले पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी निवडक नसून सर्वांसाठी समान झाली पाहिजे. दोषींवर कारवाई आणि प्रामाणिकांना संरक्षण हीच लोकशाहीची खरी ओळख आहे. अन्यथा "प्रगत महाराष्ट्र" हा नारा केवळ भाषणांपुरताच मर्यादित राहील. जनतेचा विश्वास परत मिळवायचा असेल, तर शासन आणि प्रशासनाने आत्मपरीक्षण करून ठोस कृती करणे, हाच एकमेव मार्ग आहे.

# समर्थयोगी : स्वामीभक्तीचा अलौकिक आणि प्रेरणादायी प्रवास !

श्रीस्वामी समर्थ मठ, भुईगाव (वसई) यांवर आधारित छबूबाई व्यंकटराव सांडवे निर्मित आणि चंद्रशेखर सांडवे लिखित-दिग्दर्शित नवीन चित्रपट "समर्थयोगी" दि. २२ डिसेंबर ला YouTube या माध्यमावर प्रदर्शित झालेला आहे. चित्रपटाचे कथानक स्वामीभक्त श्री. संदीपदादा म्हात्रे यांच्या संपूर्ण परिवाराचे जीवन, त्यांची दत्तभक्ती, स्वामीभक्ती आणि साक्षात श्री. स्वामी समर्थ महाराजांकडून लाभलेले दृष्टांत आणि त्यांतून उभारलेला श्री स्वामी समर्थ मठ, भुईगावं यावर आधारित आहे.

वडील तात्या यांनी रुजवलेले स्वामी भक्तीचे संस्कार संदीपदादांवर लहानपणापासून होते. पुढे जाऊन त्याचा प्रसार आणि प्रचार त्यांनी जोमाने वाढवला आणि आसपासचा संपूर्ण परिसर, गाव हा स्वामीभक्तीत लीन झाला. स्वामींप्रती असलेली असीम भक्ती आणि निष्ठा यांच पुण्यफळ म्हणून साक्षात श्रीस्वामी समर्थ महाराजांनी त्यांना अनेकदा आयुष्यात आशीर्वाद आणि दृष्टांत दिले व लोकमाध्यमांतून श्रीस्वामी समर्थ मठ, भुईगावं याची स्थापना करवून घेतली. या संपूर्ण वाटचालीत त्यांना श्री गजानन महाराज, श्री शंकर महाराज, श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या लक्ष्मीरूपाचे देखील दर्शन घडले. मोफत आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, अन्नछत्र, गोशाळा, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक अथवा वस्तुरूपी मदत अशी अनेक लोकोपयोगी कामे आज त्यांच्या हातून पार पडत आहेत.

देवा दोन मी पदरी धरा ॥ ध्रु ॥
कलियुगीं श्रीदत्तात्रेय ।
अवतार तुमचा खरा ।। देवा ॥ १ ॥
अक्कलकोटनिवासी ब्रह्म ।
सगुण हृदय उतरा ।। देवा ॥ २ ॥
श्रीज्ञानेश्वर रूप धरूनी।
शिरीं ठेवा स्वकरा ।। देवा ॥३ ॥

भक्तिभावानें ओथंबलेलें हें भावमधुर पद विदर्भातील अंध सत्पुरुष श्रीपांडुरंगनाथ ऊर्फ गुलाबराव महाराज यांचें आहे. श्रीगुलाबराव महाराज हे साक्षात् श्री ज्ञानदेव माऊलींचेच अवतार ! 'प्रत्यक्ष ज्ञानेश्वर विभूति। जगामाजीं प्रकटली' असें त्यांचें माहात्म्य.

श्रीदत्तात्रेयांचे सोळा अवतार व त्यानंतर इतिहास काळांतील श्रीपादवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती, श्रीमाणिक प्रभु व श्रीअक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ महाराज हे प्रमुख अवतारी पुरुष आहेत. श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराज यांच्यासारखे इतर अंशावतार तर अनेक आहेत. या सर्वांनीं श्री दत्तात्रेयांचें लोकोद्धोराचें कार्य केलें आहे. श्रीअक्कलकोटस्वामीमहाराज यांचे नांव अखिल महाराष्ट्रांत अत्यंत पूज्यभावानें घेतले जातें. श्रीस्वामीसमर्थांचें, अनंत चमत्कार व लीलांनी नटलेलें अत्यद्भुत चरित्र वाचतांना 'स्वामी म्हणजे चमत्कार' असा कुणाचा ग्रह होणें साहजिक आहे. परंतु चमत्कार हे कांहीं श्री स्वामींसारख्या अवतारी विभूतींचें अवतारकार्य नव्हे ! त्यांचा अवतार लोकोद्धारासाठीं वा धर्मरक्षणासाठीं आहे. या कार्याला त्यांचे चमत्कार किंवा त्यांच्या सहजलीला पोषक ठरत असतात इतकेंच ! श्री स्वामी समर्थांनीं आपल्या अवतारकार्यात प्रसंगानुरूप आपल्या भक्तांना जो उपदेश केला तो एकत्रित स्वरूपांत साररूपानें चित्रपटात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

"समर्थयोगी" या संपूर्ण चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सांस्कृतिक कलादर्पणचे संस्थापक चंद्रशेखर सांडवे यांनी केले आहे. चित्रपटाची पटकथा आणि दृश्य यांचा समन्वय अगदी छान पद्धतीने मांडला आहे. चित्रपटातील पात्रांचे संवाद योग्य पद्धतीने विस्तारलेले आहेत, कुठेही अतिशयोक्ती आढळत नाही.




चित्रपटात दाखवलेली दृश्ये विविध ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रित केली आहेत ही या चित्रपटाची जमेची बाजू नक्कीच ठरलेली आहे. चित्रपट पाहतांना प्रेक्षकांना भक्तिरसाचा अनुभव देतो.

चित्रपटात श्री संदीपदादा म्हात्रे यांच्यावर आधारित असणाऱ्या पात्राची प्रमुख भूमिका चंद्रशेखर सांडवे यांनी केली आहे. तर श्रीस्वामी समर्थ महाराज यांची अजरामर भूमिका चित्रपट-मालिका क्षेत्रातील सुप्रसिद्ध अभिनेते अशोक कुलकर्णी यांनी साकारलेली आहे, तसेच श्री गजानन महाराजांचे चरित्र मालिकांद्वारे घराघरांत पोहचवणारी भूमिका अमित फाटक यांनी केली आहे, चित्रपटातील श्रीस्वामी समर्थ महाराजांचे लक्ष्मीरुप ही भूमिका अभिनेत्री सानिका मोजर हिने साकारली आहे. सहकलाकार सुबोध पवार आणि प्रकाश राणे तसेच अन्य सहकलाकारांनी देखील उत्तम साथ दिली आहे.

लेखन-दिग्दर्शन : चंद्रशेखर सांडवे
निर्मिती : छबूबाई व्यंकटराव सांडवे
सहनिर्मिती : प्रकाश राणे, विवेक पर्वते
संगीत : प्रकाश राणे
वेशभूषा : ज्योती सांडवे
कला दिग्दर्शक : स्वयंभू सांडवे
क्रिएटिव्ह दिग्दर्शक : तन्मय सांडवे
कार्यकारी निर्माता : सर्वेश सांडवे
संकलन : रिगवीट प्रॉडक्शन, रितेश पाटील
टायटल-पोस्टर डिझाईन : निखिल मालुसरे

**-निखिल मालुसरे**
(कार्यकारी संपादक-पोलादपूर अस्मिता ब्लॉगर)

# रवली पर्वत,जंगल,वृक्ष,डोंगरदऱ्याचा भाग वाचविणे काळाची गरज अन्यथा पृथ्वीचा विनाश अटळ

अरवली पर्वतांचे खनन खूप जुन्या काळापासून सुरू आहे, परंतु अवैध आणि मोठ्या प्रमाणावर होणारे खनन २००० च्या दशकाच्या सुरुवातीपासून मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने चर्चेत आले, विशेषतः २००२ मध्ये अवैध खननाबद्दल तक्रारी आल्या आणि ऑक्टोबर २००२ मध्ये खनन थांबवण्याचे आदेश सरकारकडून दिले गेले. मुख्यत्वे करून प्राचीन काळापासून अरवली पर्वत ही पृथ्वीवरील सर्वात जुन्या पर्वतरांगांपैकी एक आहे ,असे सांगितले जाते की सुमारे २ अब्ज वर्षे जुनी अरवली पर्वत रांगा आहेत आणि खनिजे काढणे हे नैसर्गिकरित्या घडत असले तरी,आधुनिक काळातील बेकायदेशीर खनन मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. २०२४-२०२५ सर्वोच्च न्यायालयाने नवीन खनन परवाने थांबवले आणि मार्च २०२४ मध्ये सीईसी ने वैज्ञानिक मॅपिंग आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन करण्याची शिफारस केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने १०० मीटरच्या व्याख्येवर पुनर्विचार केला, ज्यामुळे 'अरवली बचाव' मोहीम तीव्र झाली.अरवली पर्वतांचे खनन हे अनेक दशकांपासून सुरू आहे, परंतु अलीकडच्या काळात, विशेषतः २००२ नंतर, ते कायदेशीर आणि पर्यावरणीय वादामुळे खूप चर्चेत आले. दिल्लीपासून हरियाणा आणि राजस्थानमधून गुजरातपर्यंत सुमारे सातशे किलोमीटर पर्यंत पसरलेल्या अरवली पर्वतरांगा भारताचा नैसर्गिक किल्ला म्हणून ओळखल्या जातो म्हणजेच अरवली पर्वत भारताची अबाध्य ढाल आहे. अशा ऐतिहासिक, नैसर्गिक, सुरक्षित,प्राचीन, सांस्कृतिक भारताचा आत्मा अशा महाकाय अरवली पर्वताचे जर आपण अवैधरित्या खनन करीत असाल तर तीला हत्याच म्हणावी लागेल व येणारा काळ अक्राळविक्राळ रूप धारण करून सर्वत्र ओसाड दिसून येईल व पृथ्वीचा आणि निसर्गाचा विनाश झाल्याशिवाय रहाणार नाही.या पृथ्वीतलावर सर्वांनाच रहाण्याचा व जगण्याचा अधिकार आहे.परंतु बुध्दीजीवी मानवाने अतीरेक केला तर मानवाचा अंत तर होईलच सोबतच संपूर्ण मुक्या प्राण्यांचा पशुपक्षी,जीवजंतू, निसर्ग,स्थल,जल,वायु या सर्वांचा श्वास कोंडेल व एक वेळ अशी येईल की सर्वांनाच मृत्यू आपल्याकडे ओढेल आणि या पृथ्वीतलावर संपूर्ण जीवन लीला समाप्त होईल.त्यामुळे आज काळाची गरज आहे की वृक्ष, नदी, तलाव,पर्वतरांगा, डोंगरदऱ्याचा भाग यांना वाचविलेच पाहिजे. कारण खनन व वृक्षतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झालेला आहे आणि हा बदल एवढा झाला आहे की आपण त्याची कल्पना सुध्दा करू शकत नाही यामुळे सर्वत्रच प्रदुषणाचे सावट मोठ्या प्रमाणात दिसून येते.देशातील काही राज्यातील शहर प्रदुषणाच्या बाबतीत रेड झोनमध्ये आले आहेत आणि जगात प्रदुषणाच्या बाबतीत भारत अव्वल स्थानावर आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. दिल्ली सारख्या राजधानीमध्ये प्रदुषणामुळे संपूर्ण दिल्लीमध्ये गॅसचेंबर सारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते.हा संपूर्ण प्रकार औद्योगिकरण, शहरीकरण,जलप्रदूषण,खनन व निसर्गावर होत असलेल्या अत्याचारामुळे व अन्यायामुळे निर्माण झाला आहे.१९९० च्या दशकांपासून अरवली पर्वताच्या खननवर पर्यावरणीय निर्बंध लादले गेले आणि २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने फरिदाबाद,गुरूग्राम आणि मेवात जिल्ह्यामध्ये खाणकामावर बंदी घालण्यात आली होती. तरीही बेकायदेशीर खाणकाम अजूनही सुरू असल्याचे दिसून आले.यावरून स्पष्ट होते की गेल्या अनेक दशकांपासून अरवली पर्वताचे खाणकाम सुरूच आहे. यावरून स्पष्ट होते की खनन माफिया अरवलीच्या भोवताल सक्रिय आहेत.परंतु अरवली पर्वताच्या होत असलेले तिव्र आंदोलन व विरोध पहाता केंद्र सरकारने आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संरक्षित क्षेत्राचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे.२००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हरियाणातील काही जिल्ह्यांमध्ये खाणकामावर पूर्णपणे बंदी घातली होती.तरीही खनन माफिया सक्रिय असल्याने अवैधरित्या खनन करून अरवली पर्वतांना छिन्नविछिन्न करने सुरूच आहे.परंतु आता सरकारने अरवली पर्वताला वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे याचे स्वागत. नोव्हेंबर २०२५ मध्ये पर्यावरण मंत्रालयाच्या नेतृत्वाखालील समितीच्या शिफारशीनुसार सर्वोच्च न्यायालयाने अरवली टेकड्या आणि अरवली पर्वतरांगा यांच्या एकसमान कायदेशीर व्याख्येचा स्वीकार केला.या व्याख्येनुसार "अरवली टेकडी"म्हणजे स्थानिक आसपासच्या भुभागापेक्षा किमान १०० मीटर उंचीची भूरचना आणि अरवली पर्वतरांगा म्हणजे एकमेकांपासून ५०० मीटरच्या आत अशा दोन किंवा अधिक टेकड्यांचा समूह असे निश्चित करण्यात आले आहे.मात्र या व्याख्याबदलामुळे अरवली क्षेत्राचा ९० टक्के भाग खान कामासाठी खुला होईल,असा आरोप आंदोलकांनी केला आहे.मात्र हा आरोप सरकारने नाकारला असुन अरवलीच्या संरक्षणास कटिबद्ध असल्याचा दावा सरकारने केला आहे.परंतु सरकारचा दावा कितपत सत्य आहे ही बाब पुढील काही काळात लक्षात येईल.सरकारने निसर्गाचा होत असलेला ह्यास पहाता महत्वपूर्ण अरवली पर्वताचे खनन पुर्णतः थांबविले पाहिजे. कारण आज अरवली पर्वताच्या रांगामुळे अनेक विनाशकारी दुर्घटना रोखण्यास मोठी मदत होते आहे व संपूर्ण जीव सृष्टीला मोकळा आणि आल्हाददायक वातावरण निर्माण करण्याचे काम अरवली पर्वताच्या माथ्यावर होत आहे. आज आपल्याला अती ऊन,अती पाऊस, सुनामी, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, ग्लेशियर वितळने, जलप्रदूषण, वायुप्रदूषण, अवकाळी पाऊस,वणवा लागने यावर जर मात करायची असेल तर अरवली पर्वतासारखे संपूर्ण पर्वत व डोंगरदऱ्या यांना वाचविणे काळाची गरज आहे.देशातील राज्य सरकारे व केंद्र सरकार विकासाच्या नावाखाली निसर्गाची खुलेआम कत्तल करीत आहे ही बाब देशातील १४० कोटी जनता उघड्या डोळ्यांनी पहात आहे आणि याचे उदाहरण सर्वांसमोर आहे. त्यामुळेच आज शहरात व गावात हिंसक प्राण्यांचा शिरकाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि यामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात मानवीय व पाळीव प्राण्यांची हाणी होत आहे. सोबतच पाणी टंचाई,जंगलाला वनवा लागने, जंगलातील पशुपक्षांना खाद्यपुर्ती या जंगल तोडीमुळे न होणे या संपूर्ण गोष्टींना जबाबदार देशातील राज्य व केंद्र सरकार आहे. निसर्गाचा होत असलेला ह्यास पहाता सरकारने खनन परवाने वाटप पुर्णतः बंद केले पाहिजे, औद्योगिकरण,शहरीकरण,वाळू उत्खनन यावर अंकुश लावला पाहिजे व अरवली पर्वत रांगा वाचविण्यासाठी सरकारने युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत कारण अरवली पर्वत रांगा ह्या भारताच्या सुरक्षेची ढाल आहे.

लेखक



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# बांगलादेशातील वाढत्या हिंसाचाराबद्दल अमेरिकन खासदारांकडून चिंता

बांगलादेश पुन्हा एकदा हिंसाचाराच्या गर्तेत सापडला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीच हे घडत आहे. या निवडणुकांबद्दलची चिंता आता अमेरिकेत पसरली आहे. या चिंतेचे एक प्रमुख कारण म्हणजे माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या पक्षावर, अवामी लीगवर, पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. शेख हसीना यांच्या पक्षावर, अवामी लीगवर, पूर्ण बंदी घालण्याबाबत अनेक अमेरिकन कायदेकर्त्यांनी चिंता व्यक्त केली आहे हे लक्षात घेता, हे समजण्यासारखे आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होत असताना ही बंदी घालण्यात आली आहे. मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारने १२ मे रोजी अवामी लीग अधिकृतपणे विसर्जित केली.

पुढील वर्षीच्या सुरुवातीला म्हणजे २०२६ मध्ये होणाऱ्या बांगलादेशच्या निवडणुकांपूर्वी अवामी लीगच्या कारवायांवर पूर्ण बंदी घालण्यात आल्याबद्दल अमेरिकन कायदेकर्त्यांच्या एका गटाने चिंता व्यक्त करत बांगलादेश मध्ये होत असलेल्या हिंसेवर व मानवाधिकाराच्या उल्लंघनावर प्रश्न उपस्थित करत चिंता व्यक्त केली आहे. अमेरिकेतील खासदारांनी बांगलादेशच्या लोकांना मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांद्वारे सरकार निवडण्याची संधी मिळाली पाहिजे,असे युनूस सरकारला लिहिलेल्या पत्रातून कळविले आहे. हाऊस फॉरेन अफेयर्स कमिटी रँकिंग सदस्य ग्रेगरी मीक्स, दक्षिण आणि मध्य आशिया उपसमितीचे अध्यक्ष बिल हुइझेंगा, दक्षिण आणि मध्य आशिया उपसमितीचे रँकिंग सदस्य सिडनी कामलेगर-डोव्ह आणि काँग्रेसवुमन जूली जॉन्सन यांनी मंगळवारी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांना एक पत्र पाठवले, ज्यामध्ये फेब्रुवारीच्या निवडणुकीपूर्वी एका राजकीय पक्षावर पूर्ण बंदी घालण्यात आल्याबद्दल चिंता व्यक्त केली गेली. उल्लेखनीय म्हणजे बांगलादेशमध्ये अवामी लीग या पक्षावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

या पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्यांमध्ये काँग्रेसमन टॉम सुओझी यांचा समावेश आहे. कायदेकर्त्यांनी म्हटले आहे की अंतरिम सरकारने सर्व राजकीय पक्षांच्या सहकार्याने मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे जेणेकरून बांगलादेशातील लोकांचा आवाज मतपेटीद्वारे शांततेने व्यक्त करता येईल आणि सरकारी संस्थांच्या निष्पक्षता आणि विश्वासार्हतेवर विश्वास पुनर्संचयित करणारे सुधारणा लागू केले जातील. युनूस सरकार किंवा निवडून आलेले उत्तराधिकारी राजकीय पक्षाच्या क्रियाकलापांना स्थगिती देण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. बांगलादेशने सुधारित दहशतवादविरोधी कायद्याअंतर्गत पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाच्या सर्व क्रियाकलापांवर रात्रीतून बंदी घातली आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की बांगलादेशच्या अंतरिम सरकारने देशातील सर्व राजकीय पक्षांबरोबर समन्वय साधून असे वातावरण निर्माण करावे की ज्यामुळे देशात निपक्ष मुक्त आणि शांततापूर्ण निवडणुका पार पडू शकतील मात्र असे होणे शक्य नसल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे कारण अंतरिम सरकारने राजकीय पक्षांच्या हालचालींवर निर्बंध घातले असून त्रुटी पूर्ण आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरण पुन्हा सुरू केले आहे अमेरिकन खासदारांनी पत्रात म्हटले आहे की २०१८ आणि २०२४ मधील सार्वत्रिक निवडणुका निपक्ष नव्हत्या तसेच फेब्रुवारी महिन्यात संयुक्त राष्ट्रांच्या मानव अधिकार कार्यालयाने सादर केलेल्या अहवालानुसार जुलै आणि ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशमध्ये उसळलेल्या हिंसाचारात सुमारे १४,०० लोकांचा मृत्यू झाला.

भारतीय वंशाचे अमेरिकन काँग्रेस सदस्य राजा कृष्णमूर्ती आणि सुहास सुब्रमण्यम यांनी स्वतंत्र निवेदनात म्हटले आहे की,

बांगलादेशमध्ये अलिकडच्या काळात झालेल्या हत्या, माध्यमांवरील हल्ले आणि हिंदूंसह अल्पसंख्याक समुदायांवरील वाढत्या हल्ल्यांबद्दल अमेरिकेच्या दोन प्रभावशाली कायदेकर्त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

बांगलादेश सरकारने अल्पसंख्याकांची सुरक्षा सुनिश्चित करावी, या हत्याकांडांची पारदर्शक चौकशी करावी आणि आणखी जीवित आणि मालमत्तेचे नुकसान रोखावे अशी मागणी खासदारांनी केली. जर परिस्थिती नियंत्रित केली नाही तर ती आणखी बिकट होऊ शकते असा इशारा त्यांनी दिला.

राजा कृष्णमूर्ती यांनी बांगलादेशात हिंदू तरुण दीपू चंद्र दास यांच्या कथित जमावाने केलेल्या मारहाणीचा तीव्र निषेध केला.

त्यांनी या घटनेचा संबंध देशातील सध्याच्या अशांतता आणि अस्थिरतेशी जोडला आणि ती हिंसाचाराची लक्ष्यित आणि अत्यंत चिंताजनक कृती असल्याचे म्हटले. ते म्हणाले की काही अटक झाल्याचे वृत्त आले असले तरी, बांगलादेश सरकारने सखोल आणि पारदर्शक चौकशी करावी आणि गुन्हेगारांना कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी.

कृष्णमूर्ती यांनी असेही म्हटले की सरकारने हिंदू समुदाय आणि इतर धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी त्वरित कारवाई करावी. त्यांनी भर दिला की ही हिंसाचार थांबवला पाहिजे आणि सर्व बांगलादेशींच्या हितासाठी कायद्याचे राज्य राखले पाहिजे.

खासदार सुहास सुब्रमण्यम यांनी बांगलादेशातील बिघडत्या सुरक्षा परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की युवा नेते शरीफ उस्मान हादी यांच्या हत्येनंतर परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. हादी आगामी संसदीय निवडणुका लढवण्याची तयारी करत होते. सुब्रमण्यम यांच्या मते, त्यांच्या हत्येनंतर, माध्यमांवर हल्ले झाले, वृत्तपत्रांची कार्यालये जाळली गेली आणि अनेक लोकांच्या मृत्यूच्या बातम्या समोर आल्या.

त्यांनी दीपू चंद्र दास यांच्या हत्येचे वर्णन अत्यंत धक्कादायक असल्याचे सांगत म्हटले की, ईशनिंदेच्या आरोपाखाली एका हिंदू कारखान्यातील कामगाराची जमावाने कथितपणे हत्या केली. ते म्हणाले की ही हिंसाचार पूर्णपणे अस्वीकार्य आहे आणि त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे.

सुरमण्यम म्हणाले की, अलिकडच्या सरकार बदलापासून बांगलादेशात हिंदू आणि इतर अल्पसंख्याक समुदायांवरील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे, ज्यामध्ये घरे आणि मंदिरांवर हल्ले समाविष्ट आहेत. ते म्हणाले की या घटना एका मोठ्या आणि धोकादायक पॅटर्नकडे निर्देश करतात.शेवटी, सुब्रमण्यम म्हणाले की ते बांगलादेश आणि जगभरातील हिंदू आणि इतर अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षिततेला आणि स्थिरतेला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहेत आणि या दिशेने आवाज उठवत राहतील.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल** वर्धा
९५६१५९४३०६

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

१ २ ३ ४ ५ ६

## अर्थविश्व...

### आजकाल म्युच्युअल फंड आणि एसआयपी गुंतवणूकीचे सर्वात लोकप्रिय पर्याय



आजकाल म्युच्युअल फंड आणि एसआयपी गुंतवणूकीचे सर्वात लोकप्रिय पर्याय बनले आहेत. फक्त 500 रुपयांपासून सुरुवात करून एसआयपीची लवचिकता आणि चांगले दीर्घकालीन परतावे यामुळे सर्वोत्तम पर्याय बनला आहे. नव्याने नोकरीला किंवा अनेक वर्षांपासून गुंतवणूक करणारेही म्युच्युअल फंडात गुंतवणुकीचा मोह आवरू शकले नाही. म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक सर्वांसाठीच नव्हते. म्युच्युअल फंड मार्केट-लिंक्ड स्कीम असतात, ज्यामध्ये कोणताही हमी परतावा नसतो. म्हणून, गुंतवणूक करण्यापूर्वी म्युच्युअल फंड तुमच्यासाठी योग्य पर्याय आहेत का हेही समजून घेणं महत्त्वाचे आहे. म्युच्युअल फंडांमध्ये कमी उत्पन्न असलेले गुंतवणूकदार देखील गुंतवणूक करण्यास सहज सुरुवात करू शकतात. तुम्ही तुमच्या उत्पन्नाच्या आधारे तुमची गुंतवणूक वाढवू शकता आणि मुदतपूर्तीची कोणतीही निश्चित तारीख नाही. तुम्ही कधीही SIP थांबवू शकता किंवा पैसे काढू शकता. दीर्घकाळात तुम्हाला चक्रवाढीचा फायदा होतो आणि सरासरी 12% पर्यंत परतावा अपेक्षित आहे. पण काही महत्त्वाच्या अटींसह तुम्हाला हे फायदे मिळू शकतात ज्याकडे दुर्लक्षित करता येणार नाहीत. म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजाराच्या अधीन असते, म्हणजे परताव्याची कोणतीही हमी नाही. मार्केट उसळले तर तुम्हाला फायदा होईल, पण मार्केट घसरले तर तुमच्या गुंतवणुकीचे मूल्य कमी होऊ शकते. तुम्ही गुंतवणूकदार असाल ज्यांना निश्चित आणि गॅरंटीड रिटर्नची आवश्यकता असेल, तर म्युच्युअल फंड तुमच्यासाठी योग्य पर्याय नाही.

म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करताना एखाद्याला Expense Ratioच्या स्वरूपात शुल्क भरावे लागते जे मालमत्ता व्यवस्थापन कंपनी म्हणजेच एएमसी द्वारे निधी व्यवस्थापन, विपणन, संरक्षक, कायदेशीर आणि ऑडिटिंग सारख्या खर्चासाठी वसूल केले जाते. एक्स्पेन्स रेशो एकाच वेळी मोजले जात नाही. फंड हाऊस दैनंदिन खर्चाची गणना करतात, जे नंतर दररोज मोजले जातात. वार्षिक एक्स्पेन्स रेशो वर्षातील ट्रेडिंग दिवसांच्या संख्येने विभागले जातात आणि एकूण एनएव्हीवर लागू केले जातात. सुरुवातीला शुल्क कमी वाटू शकतात, पण कालांतराने वाढू शकतात. अशा स्थितीत, तुम्हाला तुमच्या गुंतवणुकीवरील कोणतेही शुल्क टाळायचे असेल, तर म्युच्युअल फंड तुमच्यासाठी योग्य पर्याय नाहीत.

### जानेवारीमध्ये 16 बँक सुट्ट्या

मुंबई: 2026 या नवीन वर्षाला अगदी काही दिवसातच सुरुवात होणार आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 2026 साठी Bank Holidays कॅलेंडर जारी केले आहे. या कॅलेंडरनुसार, जानेवारीमध्ये 16 बँक सुट्ट्या असतील. या सुट्ट्या राज्यानुसार बदलतील. म्हणून, देशभरातील बँका एकाच वेळी सर्व 16 दिवस बंद राहणार नाहीत. जानेवारीमध्ये कोणत्याही बँकिंग क्रियाकलापांचे नियोजन करण्यापूर्वी ग्राहकांना त्यांच्या शहरातील बँक सुट्ट्यांची यादी तपासण्याची शिफारस केली जाते. जानेवारी 2026 मध्ये, देशभरातील सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँका अनेक प्रसंगी आणि सणांसाठी बंद राहतील. यामध्ये नवीन वर्ष, स्वामी विवेकानंद जयंती, बिहू, मकर संक्रांती, नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती आणि प्रजासत्ताक दिन यांचा समावेश आहे. या दिवशी काही राज्यांमध्ये बँका सलग दोन किंवा तीन दिवस बंद राहू शकतात. दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी तसेच दर महिन्याला चार रविवारी देशभरातील बँका बंद राहतील.

1 जानेवारी 2026: नवीन वर्षाचा दिवस / गान-नगाई (आयझॉल, चेन्नई, गंगटोक, इंफाळ, इटानगर, कोहिमा, कोलकाता, शिलाँग)
2 जानेवारी 2026: नवीन वर्षाचा उत्सव / मन्नम जयंती (आयझॉल, कोची, तिरुवनंतपुरम)
3 जानेवारी 2026: हजरत अली यांचा जन्मदिन (कानपूर, लखनौ)
12 जानेवारी 2026: स्वामी विवेकानंद जयंती (कोलकाता)
14 जानेवारी 2026: मकर संक्रांती / माघ बिहू (मुंबई, अहमदाबाद, भुवनेश्वर, गुवाहाटी, इटानगर)
15 जानेवारी 2026: उत्तरायण पुण्यकाळ / पोंगल / माघी संक्रांती (बेंगळुरू, चेन्नई, गंगटोक, हैदराबाद, विजयवाडा)
16 जानेवारी, 2026: तिरुवल्लुवर दिवस (चेन्नई)
17 जानेवारी 2026: उझावर थिरुनल (चेन्नई)
23 जानेवारी 2026: नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती / सरस्वती पूजा / बसंत पंचमी (अगरतळा, भुवनेश्वर, कोलकाता)
26 जानेवारी 2026: प्रजासत्ताक दिन (मुंबईसह संपूर्ण देशात बँका बंद असणार) या कालावधीत डिजिटल बँकिंग सेवा (UPI, मोबाइल बँकिंग आणि इंटरनेट बँकिंगसह) उपलब्ध असतील त्यामुळे पैसे देवाणघेवाण प्रक्रिया ही सुरुच असेल.

### SBI ते Bank Of Baroda बँकेपर्यंत... सर्वात कमी व्याजदरात गृहकर्ज देणाऱ्या बँका

मुंबई: घर खरेदी करण्यासाठी लोक अनेकदा 20 वर्षांसाठी कर्ज घेतात. म्हणूनच, Home Loan घेताना लोकांचा सर्वात मोठा प्रश्न असा आहे की कोणती बँक सर्वात स्वस्त गृहकर्ज देते. सध्या, व्याजदर गुंतवणूक आणि ईएमआय दोन्हीवर परिणाम करत असताना, बँकांमधील गृहकर्जाच्या दरांची तुलना करणे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा विचार केला तर, व्याजदरांमध्ये तीव्र स्पर्धा आहे. नवीनतम आकडेवारीनुसार, Union Bank Of India या सध्या सर्वात कमी सुरुवातीच्या गृहकर्ज व्याजदरांपैकी एक देते. बँक ₹ 30 लाखांपर्यंतच्या गृहकर्जांवर 7.15% चा सुरुवातीचा व्याजदर देते.

हाच दर ₹ 30 लाख ते ₹ 75 लाख आणि त्यावरील कर्जाच्या रकमेवर लागू होतो, जरी वरची मर्यादा 9.50% पर्यंत जाते. हा कमी सुरुवातीचा दर युनियन बँक चांगला क्रेडिट स्कोअर असलेल्या ग्राहकांसाठी आकर्षक बनवतो. देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक एसबीआय ₹ 30 लाखांपर्यंतच्या गृहकर्जांवर 7.25% ते 8.70% दरम्यान व्याजदर देते. ही श्रेणी मोठ्या कर्ज रकमेवर देखील लागू होते. बँक ऑफ बडोदा ₹ 30 लाखांपर्यंतच्या कर्जांवर 7.45% ते 9.25% पर्यंत व्याजदर देते, तर ₹ 75 लाखांपेक्षा जास्त कर्जांवर हा दर 9.50% पर्यंत जातो. याचा अर्थ सुरुवातीच्या व्याजदरांच्या बाबतीत ते एसबीआय आणि युनियन बँकेपेक्षा थोडे महाग आहे, परंतु त्यांच्या योजना आणि ऑफर अनेक ग्राहकांना आकर्षक वाटू शकतात. बँकांव्यतिरिक्त, एलआयसी हाऊसिंग फायनान्स देखील परवडणाऱ्या दरात गृहकर्ज देत आहे. ₹ 30 लाखांपर्यंतच्या गृहकर्जांसाठी सुरुवातीचा व्याजदर 7.15% आहे, तर या मर्यादेपेक्षा जास्त रकमेवर 7.15% वार्षिक व्याज लागू आहे. गृहकर्ज देण्यापूर्वी कोणतीही बँक ग्राहकांचा क्रेडिट स्कोअर, उत्पन्न, कर्जाची रक्कम आणि प्रोफाइलचे मूल्यांकन करते, परंतु प्रथम व्याजदर अंतिम करते. चांगले CIBIL रेटिंग असलेल्या ग्राहकांना कर्ज देण्यापूर्वी, बँक व्याजदर अंतिम करण्यापूर्वी ग्राहकांचा क्रेडिट स्कोअर, उत्पन्न, कर्जाची रक्कम आणि प्रोफाइलचे मूल्यांकन करते. चांगले CIBIL रेटिंग असलेल्या ग्राहकांना सर्वात कमी व्याजदराचा फायदा होतो, तर कमकुवत स्कोअर असलेल्यांना जास्त व्याजदरांना सामोरे जावे लागू शकते. युनियन बँक ऑफ इंडिया सध्या सर्वात स्वस्त गृहकर्ज देत असल्याचे दिसून येत असले तरी, गृहकर्ज घेण्यापूर्वी ग्राहकांनी केवळ व्याजदरच नव्हे तर प्रक्रिया शुल्क, प्रीपेमेंट शुल्क आणि दीर्घकालीन EMI चा देखील विचार केला पाहिजे.

# पहिल्याच चेंडूवर 'हिटमॅन'चा धक्का!

## देवेंद्र सिंग बोरा बनला १२ हजार चाहत्यांच्या शांततेचे कारण





जयपूर- जयपूर येथील सवाई मानसिंग स्टेडियमवर सुरू असलेल्या विजय हजारे ट्रॉफी 2025-26 मधील मुंबई विरुद्ध उत्तराखंड सामन्यात क्रिकेटप्रेमींना मोठा धक्का बसला. पहिल्या सामन्यात 155 धावांची वादळी खेळी करणाऱ्या रोहित शर्माकडून पुन्हा एकदा तसाच धमाका पाहण्याची अपेक्षा असलेल्या चाहत्यांच्या आशा एका चेंडूतच भंग पावल्या. स्टेडियममध्ये 'रोहित... रोहित...'च्या घोषणा घुमत असतानाच उत्तराखंडचा वेगवान गोलंदाज देवेंद्र सिंग बोरा याने पहिल्याच चेंडूवर रोहित शर्माला बाद करत संपूर्ण वातावरण शांत केले. सुमारे 12 हजार प्रेक्षक क्षणात स्तब्ध झाले. उत्तराखंडकडून केवळ तिसरा लिस्ट-ए सामना खेळणाऱ्या देवेंद्र सिंग बोराने थेट टीम इंडियाच्या 'हिटमॅन'ला तंबूत पाठवत आपली ओळख निर्माण केली. 25 वर्षीय देवेंद्र बोरा हा उत्तराखंडच्या बागेश्वर जिल्ह्याचा रहिवासी असून राज्यासाठी खेळण्याचे हे त्याचे दुसरेच वर्ष आहे. 6 डिसेंबर 2000 रोजी जन्मलेल्या देवेंद्रने 2024 मध्ये डेहराडून येथे पुद्दुचेरीविरुद्ध रणजी ट्रॉफीमधून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

त्याच वर्षी जयपूरमध्ये मणिपूरविरुद्ध त्याने लिस्ट-ए क्रिकेटमध्येही पदार्पण केले. आतापर्यंत लिस्ट-ए क्रिकेटमध्ये दोन सामने खेळताना त्याने 4 विकेट्स घेतल्या असून 44 धावांत 4 विकेट्स ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. ही कामगिरी त्याने 24 डिसेंबर रोजी हिमाचल प्रदेशविरुद्ध केली होती, जरी त्या सामन्यात उत्तराखंडला 59 धावांनी पराभव स्वीकारावा लागला. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये देवेंद्र बोरा यांनी 15 सामने खेळून 30 विकेट्स घेतल्या आहेत. त्यांची सर्वोत्तम कामगिरी 79 धावांत 6 विकेट्स अशी आहे. यावर्षीच्या सुरुवातीला उत्तराखंड प्रीमियर लीगमध्ये डेहराडून वॉरियर्सकडून खेळताना केवळ 6 सामन्यांत 10 बळी घेत त्याने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले होते.

रोहित शर्माची ही खेळी मागील सामन्यातील त्याच्या कामगिरीपेक्षा अगदी वेगळी होती. बुधवारी त्याने शानदार शतक झळकावून गोलंदाजांना अक्षरशः धुडकावून लावले होते, परंतु शुक्रवारी त्याला एकही धाव काढता आली नाही. या बाद झाल्यानंतर मुंबईने फक्त 4 धावांवर आपला पहिला बळी गमावला. रोहितच्या फलंदाजीने मागील सामन्यात चाहत्यांना उत्साह दिला होता, तर या शून्य धावांमुळे मुंबईच्या फलंदाजी क्रमावर दबाव निर्माण झाला. हिटमॅनची फलंदाजी लाईव्ह पाहण्यासाठी जयपूरचे क्रिकेट चाहते मोठ्या संख्येने आले होते. रोहित शर्मा बाद होताच आणि पॅव्हेलियनकडे चालायला सुरुवात करताच प्रेक्षकांमध्ये निराशा स्पष्टपणे दिसून आली. रोहितच्या लवकर बाद झाल्यामुळे अनेक चाहते सामना संपण्याची वाट न पाहता हळूहळू स्टेडियम सोडून निघून गेले. रोहितच्या बाद झाल्यानंतर सामना सुरू होण्यापूर्वी स्टेडियममध्ये असलेला आवाज आणि उत्साह पूर्णपणे नाहीसा झाला. याउलट विराट कोहलीने अर्धशतकी खेळी खेळली असून आता अजून किती धावा करतो याकडे चाहत्यांच्या नजरा असतील.

कारकिर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात असताना, जगातील सर्वोत्तम व्हाईट-बॉल फलंदाजांपैकी एक असलेल्या रोहित शर्माची विकेट घेणे हे देवेंद्र सिंग बोरासाठी स्वप्नपूर्तीच ठरली असून, उत्तराखंड क्रिकेटला एक नवा वेगवान गोलंदाज मिळाल्याचे संकेत यातून स्पष्ट होत आहेत.

## रोहित-विराटची पहिल्या मॅचमध्ये सेंच्युरी

नवी दिल्ली : रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात दमदार शतकं लगावली आणि सर्वांच मनं जिंकली होती. पण आता रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा विजय हझारे ट्रॉफीतील दुसरा सामना नेमका कधी आणि कुठे खेळवण्यात येणार आहे, याची माहिती आता समोर आली आहे.

रोहित शर्माचा पुढचा सामना कधी आणि कुठे होणार..

रोहित शर्मा विजय हझारे ट्रॉफीतील पहिला सामना हा सिक्कीमबरोबर खेळला होता. या सामन्यात रोहित शर्माने दमदार शतक झळकावले होते आणि त्याने मुंबईच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला होता. या शतकाच्या जोरावर रोहित शर्माने सामनावीर हा किताबही पटकावला होता. आता रोहित शर्मा विजय हझारे ट्रॉफीतील दुसरा सामना खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. मुंबईचा या स्पर्धेतील दुसरा सामान हा उत्तराखंड या संघांशी होणार आहे. हा सामना २६ डिसेंबर म्हणजेच शुक्रवारी होणार आहे. हा सामना जयपूरमध्ये खेळवण्यात येणार आहे.विराट कोहली गेल्या वनडे मालिकेत दमदार फॉर्मात होता. या मालिकेत त्याने सर्वाधिक धावा केल्या होत्या आणि त्यामुळेच त्याला मालिकावीर हा पुरस्कार मिळाला होता. विराट कोहलीने आपला हा फॉर्म विजय हझारे ट्रॉफीतही कायम ठेवला. कारण विराट कोहलीने या स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात धमाकेदार शतक झळकावले होते. त्यानंतर आता विराट कोहली आपला दुसरा सामना खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. विराट कोहलीच्या दिल्ली संघाचा सामना आता गुजरातच्या संघाबरोबर होणार आहे. हा सामना २६ डिसेंबरला खेळवला जाणार आहे. विराट कोहलीचा हा दुसरा सामना आरसीबीच्या घरच्या मैदानात म्हणजेच बंगळुरु येथे खेळवला जाणार आहे. त्यामुळे या सामन्यासाठी चाहते विराटला पाठिंबा देण्यासाठी जोरदार गर्दी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात शतक पूर्ण केले होते.




## विजय हजारे ट्रॉफीची मॅच खेळली नाही; थेट दिल्ली गाठली

### वैभवसाठी आजचा दिवस ठरला खास

दिल्ली: भारताचा तरुण क्रिकेटपटू Vaibhav Suryavanshi हा दिवसेंदिवस नवीन टप्पे गाठत आहे. केवळ 14 वर्षांचा वैभवने क्रिकेट जगतात धुमाकूळ घातला आहे आणि अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. क्रिकेटच्या मैदानावरील त्याच्या उल्लेखनीय यशामुळे त्याला आता विशेष सन्मानाने गौरवण्यात आले आहे. भारत सरकारकडून वैभवला खास पुरस्कार मिळाला आहे.

वैभव सूर्यवंशीला देशातील सर्वोच्च बाल पुरस्कार, Pradhan Mantri Rashtriya Bal Puraskar सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एका विशेष समारंभात बिहारच्या युवा क्रिकेटपटूला पुरस्कार प्रदान केला. शुक्रवार, 26 डिसेंबर रोजी, जेव्हा बिहार संघ विजय हजारे ट्रॉफीमधील दुसऱ्या सामन्यासाठी मैदानावर होता, तेव्हा संघाचा सुपरस्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात उपस्थित होता. दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही, देशभरातील अनेक तरुणांना आणि मुलांना त्यांच्या कामगिरीसाठी, काहींना त्यांच्या शौर्यासाठी, तर काहींना क्रीडा, संगीत किंवा विज्ञानातील योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात आला.हा पुरस्कार क्रीडा, कला, संस्कृती, शौर्य किंवा विज्ञान यासारख्या क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी करणाऱ्या 5 ते 18 वयोगटातील मुलांना दिला जातो. यावर्षीच्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये वैभवने आपल्या फलंदाजीने खळबळ उडवून दिली. अरुणाचल प्रदेशविरुद्धच्या सामन्यात त्याने स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी 190 धावांची वादळी खेळी करत विक्रमी शतक झळकावले आणि अनेक विक्रम रचले. आयपीएलच्या इतिहासात लिलावात विकला जाणारा वैभव हा सर्वात तरुण खेळाडू ठरला. वैभवने मागील एक वर्ष पूर्णपणे गाजवलं. देशांतर्गत सामने असो आयपीएल असो किंवा भारतासाठी खेळणे असो सगळ्याच मॅचमध्ये वैभवने आपली तुफानी खेळी खेळली.




## न्यूझीलंड विरुद्ध मालिका गाजवण्यासाठी 'तो' संघात परतणार

मुंबई: टीम इंडिया अवघ्या काही दिवसांतच मैदानात परतणार आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या मालिकेत भारतीय संघ न्यूझीलंडचा सामना करणार आहे. जानेवारीमध्ये न्यूझीलंडचा संघ भारत दौऱ्यावर येत आहे, ज्यामध्ये एकदिवसीय आणि टी-20 मालिका खेळल्या जातील. एकदिवसीय मालिका 11 जानेवारीपासून सुरू होत आहे, परंतु या मालिकेसाठी संघाची घोषणा अद्याप झालेली नाही. 21 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या टी-20 मालिकेसाठी संघ जाहीर करण्यात आला आहे, ज्यामुळे सर्वांना आश्चर्य वाटले. आता एका खेळाडूची खूप चर्चा होत असून त्याच्या कमबॅकची लोक आतुरतेने वाट पाहत आहे.

भारतीय एकदिवसीय संघाचा उपकर्णधार Shreyas Iyer गेल्या दोन महिन्यांपासून दुखापतीमुळे मैदानाबाहेर आहे. ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान झालेल्या सामन्यादरम्यान अय्यरला ही दुखापत झाली. 25 ऑक्टोबर रोजी सिडनी येथे झालेल्या मालिकेच्या शेवटच्या सामन्यात कॅच घेण्यासाठी डायव्हिंग करताना अय्यरला गंभीर दुखापत झाली. सिडनीमध्ये त्याची शस्त्रक्रिया झाली आणि काही दिवस रुग्णालयात दाखल करण्यात आले. परिणामी, तो दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत सहभागी होऊ शकला नाही.

31 वर्षीय श्रेयस अय्यर तेव्हापासून घरी विश्रांती घेत आहे आणि तो बरा होण्याच्या प्रक्रियेतून जात आहे. हळूहळू तो कमबॅक करण्याची तयारी करत आहे. अय्यरने अखेर 60 दिवसांत पहिल्यांदाच फलंदाजीचा सराव केला. टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, 24 डिसेंबर रोजी मुंबईत सुमारे एक तास फलंदाजी केली. सामन्यादरम्यान त्याला कोणतीही अस्वस्थता जाणवली नाही.


त्यानंतर तो 25 डिसेंबर रोजी बेंगळुरू येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे पोहोचला, जिथे तो त्याची पुढील पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करेल.

अय्यर सुमारे सहा दिवस सीओईमध्ये राहू शकतो, जिथे वैद्यकीय पथक त्याच्या तंदुरुस्तीचे निरीक्षण करेल. 11 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंड एकदिवसीय मालिकेवर श्रेयसचे लक्ष असताना, बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले की त्या मालिकेत त्याचा सहभाग हा एक महत्त्वाचा निर्णय असू शकतो. तो विजय हजारे ट्रॉफीच्या पुढील फेऱ्यांमध्ये खेळू शकेल अशी शक्यता जास्त आहे, जी एकदिवसीय मालिकेदरम्यान सुरू राहील. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात एकदिवसीय मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा होण्याची अपेक्षा आहे आणि अय्यरला संघात समाविष्ट केले जाऊ शकते, परंतु यामध्ये फिटनेस चाचणीचा समावेश असू शकतो.



## महत्त्वाचे...

### संभाजीनगरला बिबट्यांचा विळखा!:9 तालुक्यांतील 44 गावांत 'डरकाळी'



छत्रपती संभाजीनगर- नाशिकपाठोपाठ आता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यालादेखील बिबट्यांनी आपल्या विळख्यात घेतले आहे. जिल्ह्यातील तब्बल ९ तालुक्यांमध्ये बिबट्यांचे रोज दर्शन होत असून शहर आणि परिसरातील ४४ गावांमध्ये बिबट्याचा वावर अधिकृतपणे आढळला आहे. सध्या सुरू असलेल्या ऊसतोडणी आणि मक्याच्या सोंगणीमुळे बिबट्यांचे नैसर्गिक आश्रयस्थान नष्ट होत असल्याने ते आता थेट नागरिकांच्या संपर्कात येत आहेत. नाशिक विभागाचे हेड ऑपरेशन-रेस्क्यू अभिजित महाले यांनी सांगितले की, 'बिबट्यांचा अधिवास आता पूर्णपणे बदलला आहे. ते जंगल सोडून शेतात राहू लागले आहेत. सध्या शेतात ऊस आणि मका काढणीचा हंगाम जोरात सुरू आहे. लपण्यासाठी जागा उरली नसल्याने बिबट्या बाहेर पडत असल्याची माहिती आहे.पुणे आणि नाशिकमधील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने आता वाघ आणि बिबट्यांच्या हल्ल्यांना 'राज्य आपत्ती' घोषित केले आहे. तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार (संदर्भ दुरुस्ती : वनमंत्रिपदाच्या संदर्भासह) यांनी जाहीर केल्याप्रमाणे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास वारसांना सरकारी नोकरीत सामावून घेतले जाईल.

### नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी, शनिशिंगणापूर भाविकांनी गजबजले

शिर्डी -नाताळच्या सलग सुट्ट्या, सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागतामुळे शिर्डी, शनिशिंगणापूर सध्या भाविकांच्या उत्साहाने गजबजून गेले आहे. शिर्डीत गुरुवारी एका दिवशी ९५ हजारांहून अधिक भाविकांनी साईंचे दर्शन घेतले. सकाळपासूनच मंदिर परिसर, दर्शन रांगा तसेच शिर्डीतील प्रमुख रस्त्यांवर भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून आली. शनिशिंगणापुरात गुरुवारपासून नववर्ष दिनापर्यंत भाविकांची संख्या वाढणार असली तरी यंदा प्रथमच रात्रीचे दर्शन बंद असणार आहे. त्यामुळे पुढील ८ दिवसांत तब्बल साडेतीन ते ४ लाख भाविक दर्शनासाठी येतील, असा अंदाज देवस्थान प्रशासनाने व्यक्त केला आहे.शनिदेव मंदिर परिसरात सायंकाळ होताच आकर्षक विद्युत रोषणाई उजळून निघाला आहे. मंदिर, दर्शन मार्ग, तसेच पानसतीर्थ प्रकल्पावरील शिल्पकलेवर करण्यात आलेली रोषणाई लक्ष वेधून घेत आहे. फुलांची रोजची सजावट मंदिराच्या सौंदर्यात भर घालत आहे. गेल्या शनिअमावस्येपासून सुरू झालेला हा प्रकाशोत्सव नववर्षापर्यंत राहणार आहे. गुरुवारपासून नाताळ सुट्ट्या सुरू झाल्या. त्यानंतर नववर्ष येत आहे. शिर्डीला वर्षअखेरीस दर्शनासाठी येणारे भाविक मुक्कामी असतात. त्यापैकी सुमारे ४० टक्के भाविक शनिशिंगणापुरात येऊन शनिदेवाचे दर्शन घेतात. विशेषतः शनिवार व रविवारी भाविकांची गर्दी तीन पटीने वाढत असल्याचे चित्र आहे. आयुक्त, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे आणि प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत दर्शन व्यवस्था व गर्दी नियंत्रणाबाबत बुधवारी आढावा बैठक घेण्यात आली. नववर्षाच्या स्वागतासाठी शनिशिंगणापूर सज्ज झाले असून, भाविकांच्या सुरक्षित व सुरळीत दर्शनासाठी प्रशासन तयारी करत आहे. पार्किंग व्यवस्था, दर्शन रांगा, प्रसाद वाटप, वाहतूक नियंत्रण यावर भर देण्यात येत आहे.शिर्डीत सकाळपासूनच मंदिर परिसर, दर्शन रांगा तसेच शिर्डीतील प्रमुख रस्त्यांवर भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून आली. भाविकांची संख्या अचानक वाढल्याने शिर्डी शहरात काही ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली. विशेषतः मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहनांच्या रांगा लागल्याने भाविकांना काही काळ ट्रॅफिक जॅमचा सामना करावा लागला. सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर परिसरात अतिरिक्त कर्मचारी तैनात ठेवण्यात आले होते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण परिसरावर नजर ठेवण्यात येत होती.

# जोडे चाटून मते मागण्याचे उद्धव ठाकरेंचे राजकारण

## मतांसाठी लांगुलचालनाचा आरोप; देवेंद्र फडणवीसांची कडवी टीका

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई: राज्यातील राजकारणात ठाकरे बंधूंच्या युतीच्या चर्चांमुळे आधीच वातावरण तापले असताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या युतीवर अत्यंत कठोर आणि आक्रमक शब्दांत टीका केली आहे. ठाकरे बंधूंना लक्ष्य करत, सध्याचे त्यांचे राजकारण मतांसाठी लांगुलचालनावर आधारित असल्याचा आरोप त्यांनी केला. फडणवीस म्हणाले की, काही विशिष्ट घटकांची मर्जी राखण्यासाठी आणि मतांचे राजकारण साधण्यासाठी जे प्रयत्न सुरू आहेत. त्यातून संबंधित नेत्यांचा विचार, दिशा आणि चारित्र्य स्पष्टपणे जनतेसमोर येत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा उल्लेख करत, त्यांच्या सुपुत्राकडून घेतल्या जात असलेल्या निर्णयांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. छत्रपती संभाजीनगरमध्ये रशिद खान मामू यांना पक्षात प्रवेश देण्यात आल्याचा संदर्भ देत फडणवीस यांनी हा निर्णय केवळ मतांचे लांगुलचालन करण्यासाठी असल्याचा आरोप केला. अशा प्रकारे व्यक्तीविशेषांना पक्षात सामावून घेणे म्हणजे विचारधारेचा त्याग असून, यातून संबंधित नेतृत्वाची वैचारिक घसरण स्पष्टपणे दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

फडणवीस यांनी आणखी आक्रमक शब्दांत सांगितले की, विशिष्ट लोकांचे जोडे चाटायचे आणि त्यातून मते मिळवायची, हा प्रकार महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला साजेसा नाही. सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी दाखवली जात असल्याचे त्यांनी म्हटले. मात्र, अशा राजकारणाला जनता भुलणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. देशावर प्रेम करणारे, राष्ट्रनिष्ठ आणि विचारांशी प्रामाणिक असलेले नागरिक हे सर्व बारकाईने पाहत असल्याचे सांगत, या प्रकारच्या राजकारणाची किंमत संबंधितांना मोजावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.



ठाकरे बंधूंच्या युतीवर टीका करताना फडणवीस यांनी महायुतीबाबतही आपली भूमिका स्पष्ट केली. महायुतीची घोषणा करण्याची आम्हाला कोणतीही घाई नाही किंवा आवश्यकता नाही, असे ते म्हणाले. आम्ही आधीपासूनच एकत्र आहोत आणि आमच्यात कोणताही संभ्रम नाही, असा दावा त्यांनी केला. विरोधकांकडून होणाऱ्या घोषणा या केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी असल्याचा टोला त्यांनी लगावला. आमच्यातील एकजूट कृतीतून दिसते, घोषणांमधून नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे उदाहरण देत विरोधकांची खिल्ली उडवली. पुतीन आणि झेलेन्स्की एकत्र येणार असतील, तरच त्यांना घोषणा करावी लागते, असा उपरोधिक उल्लेख करत त्यांनी ठाकरे बंधूंच्या युतीच्या घोषणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात त्यांच्यात नेमकं काय सुरू आहे, हेच कुणालाच कळत नाही, असा टोमणाही फडणवीस यांनी मारला. महायुती योग्य वेळी योग्य पद्धतीने आपली भूमिका जाहीर करेल, असे त्यांनी सांगितले.

## उद्या संजय राऊत भाजपमध्ये आले तर आश्चर्य नाही-गिरीश महाजनांचे सूचक विधान

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



मुंबई: भाजपवर टीका करणारे अनेक नेते आज भाजपमध्ये दिसत आहेत. त्यामुळे उद्या संजय राऊतही भाजपमध्ये आले तर आश्चर्य वाटणार नाही, असे सूचक विधान मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. महाराष्ट्राचे राजकारण महापालिका निवडणुकीच्या तोंडावर तापले असताना त्यांनी हे विधान केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

गिरीश महाजन यांच्या नेतृत्वात गुरुवारी नाशिक येथील मनसे व ठाकरे गटाचे बडे पदाधिकारी भाजपमध्ये आले. यावेळी भाजपच्या स्थानिक आमदार देवयानी फरांदे व त्यांच्या समर्थकांनी या पक्षप्रवेशाला कडाडून विरोध केला. विरोधी पक्षांनीही या प्रकरणी भाजपला खडेबोल सुनावले. पण गिरीश महाजन यांनी राजकारणातील वास्तव मांडत या टीकेला फारसे महत्त्व नसल्याचे ठणकावून सांगितले. ते म्हणाले, जे आमच्यावर टीका करतात, ते उद्या आमच्यासोबतही येऊ शकतात. उद्या संजय राऊत भाजपमध्ये आले तर आश्चर्य वाटायला नको.

ते म्हणाले, राजकारणात विरोध व टीका ही कायमस्वरुपी नसेत. आज भाजपमध्ये असणारे अनेक नेते पूर्वी भाजपविरोधात बोलत होते. पण आज तेच नेते भाजपमध्ये आहेत. आमदार व मंत्री अशा विविध पदांवर जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. यावरून पक्षवाढ हीच खरी राजकीय वस्तुस्थिती आहे हे स्पष्ट होते. भाजप हा सत्ताधारी पक्ष आहे. भाजपकडे विविध विचारांचे नेते येत आहेत. ही बाब पक्षाची ताकद दर्शवणारी आहे. पक्षाचा विस्तार होत आहे हीच खरी गोष्ट आहे. त्यामुळे या प्रकरणी पक्षावर होणाऱ्या टीकेला फार महत्त्व देण्याची गरज नाही. राजकारणात काहीही होऊ शकते अशी सध्याची परिस्थिती आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे संजय राऊत यांनी काल नाशिकमध्ये झालेल्या पक्षप्रवेशावरून भाजप व गिरीश महाजन यांच्यावर सडकून टीका केली. जे आमच्याकडून गेले किंवा मनसेतून गेले ते भटकेच आहेत. गिरीश महाजन स्वतःला बाहुबली समजतात. पण त्यांनाही नगरपालिकेत फटका बसला आहे. त्यांची पत्नी निवडून आली, पण इतर कारणांमुळे त्यांना त्यांना फटका बसला.

## मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले २४ दिवसांपासून फरार : अटकपूर्व जामीनही फेटाळला

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

महाड नगरपरिषद निवडणुकीदरम्यान झालेल्या मारहाण प्रकरणात राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांना मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विकास गोगावले यांनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. मतदानाच्या दिवशी घडलेल्या हिंसाचारामुळे आधीच राजकीय वातावरण तापलेले असताना, आता न्यायालयाच्या या निर्णयामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही दोन वेगवेगळ्या न्यायालयांनी विकास गोगावले यांना दिलासा देण्यास नकार दिला होता.





महाड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक 2 मध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. याच दरम्यान शिंदे गटाचे पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या मारहाणीत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप विकास गोगावले आणि त्यांच्या समर्थकांवर करण्यात आला आहे. या घटनेनंतर महाड पोलिस ठाण्यात विकास गोगावले यांच्यासह एकूण 29 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र गुन्हा दाखल होताच सर्व आरोपी भूमिगत झाले आणि आजपर्यंत ते पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

या प्रकरणात विकास गोगावले यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. माणगाव न्यायालयात त्यांनी दोन वेळा अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला, मात्र दोन्ही वेळा न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी मुंबई न्यायालयातही धाव घेतली, परंतु तिथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. सलग तिसऱ्यांदा जामीन नाकारण्यात आल्याने विकास गोगावले यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे. गेल्या 24 दिवसांपासून ते फरार असल्याची माहिती असून, पोलिसांकडून त्यांचा कसून शोध सुरू आहे. याच प्रकरणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी नाना जगताप हे देखील अद्याप फरार असल्याचं समोर आलं आहे.

या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय वर्चस्वाची लढाई असल्याची चर्चा रंगली आहे. महाड नगरपालिका निवडणुकीदरम्यान विकास गोगावले आणि सुशांत जाबरे समर्थकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संघर्ष झाला होता. या राड्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात परस्पर तक्रारी दाखल करण्यात आल्या. मात्र न्यायालयाने आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जांना नकार दिल्यानंतर, संबंधित सर्व आरोपी भूमिगत झाल्याचं चित्र आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनावरही आरोपींना अटक करण्याचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

## उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदेंचे फोन, तरी निवडला काँग्रेसचा मार्ग

### दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांना हादरवणारे प्रशांत जगताप नेमके कोण?

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई: राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजताच राजकीय हालचालींना मोठा वेग आला असून, पुणे महानगरपालिका निवडणूक पुन्हा एकदा केंद्रस्थानी आली आहे. पुण्यातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत असून, शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये संभाव्य युतीच्या चर्चांनी वातावरण तापले आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येऊन पुणे महापालिकेची निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला असतानाच या निर्णयाला तीव्र विरोध करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी थेट राजीनाम्याचं अस्त्र उपसले आहे. या घडामोडीमुळे पुण्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

प्रशांत जगताप यांनी पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर पत्रकार परिषद घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्राथमिक आणि क्रियाशील सदस्यत्वाचा राजीनामा जाहीर केला. या पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी पक्षाच्या नेतृत्वाने आपल्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आणि आतापर्यंत मिळालेल्या संधींबद्दल आभार मानले. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चांमुळे आपली वैचारिक भूमिका डावलली जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पत्रकार परिषदेदरम्यान प्रशांत जगताप भावूक झाल्याचंही



पाहायला मिळालं. अनेक वर्षांच्या राजकीय प्रवासानंतर घेतलेला हा निर्णय त्यांच्यासाठी वेदनादायी असल्याचं त्यांच्या शब्दांतून स्पष्ट दिसत होतं.राजीनाम्यानंतर लगेचच प्रशांत जगताप काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून जगतापांच्या पक्षप्रवेशाला हिरवा कंदील मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याचदरम्यान, शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गटाकडूनही प्रशांत जगताप यांना संपर्क साधण्यात आल्याची माहिती समोर आली. मात्र दोन दिवसांपूर्वीच आपण काँग्रेसच्या विचारधारेचा असल्याचं स्पष्ट करत, शिवसेनेत जाण्याची शक्यता जगताप यांनी नाकारल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे काँग्रेस प्रवेशावरच त्यांची शिक्कामोर्तब झाला.प्रशांत जगताप यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिल्यास ते पुण्यातील एक अनुभवी आणि वजनदार नेते मानले जातात. त्यांनी 1999 साली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून सक्रिय राजकारणाला सुरुवात केली होती. पुणे महानगरपालिकेत त्यांनी दीर्घकाळ नगरसेवक म्हणून काम केलं असून, वानवडी प्रभागातून ते सलग तीन वेळा निवडून आले आहेत. 2007, 2012 आणि 2017 या तिन्ही महापालिका निवडणुकांत त्यांनी विजय मिळवून आपली ताकद सिद्ध केली होती. स्थानिक पातळीवरील संघटन बांधणी आणि जनसंपर्कात ते कुशल मानले जातात.

## इथे कुणाच्याही बापाची कायमस्वरुपी सत्ता नाही - विजय वडेट्टीवार

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



मुंबई: काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी राज्य व केंद्रातील भाजप सरकारवर सडकून टीका केली. निवडणुकीच्या तोंडावर आमच्या उमेदवारांवर गुन्हे दाखल करण्याचा व मारहाण झाल्याचा प्रयत्न झाला. आज तुमची सत्ता आहे म्हणून तुम्हाला मस्ती आली आहे. आज तुमचा दिवस आहे. उद्या आमचा येील. इथे कुणाच्याही बापाची कायमस्वरुपी सत्ता नाही. सत्तेचा मुकूट कायम बदलत असतो हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे, असे ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला सोडचिठ्ठी देणाऱ्या प्रशांत जगताप यांनी आज काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व विधिमंडळ पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, प्रशांत जगताप हे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटासोबत काम करत होते. पण दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र येण्याची भूमिका मांडली, त्यावेळी जगताप यांनी आपल्या विचाराशी कोणतीही तडतोड न करता पक्षाचा राजीनामा दिला. मी जातीयवादी पक्षासोबत जाणार नाही, मी काँग्रेससोबत राहील व कोणत्याही परिस्थितीत मी तडजोड करणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## शिवसेनेशी युती होणार हे अंतिम:मुंबईतील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला, सध्या उमेदवार फायनल करणे सुरु - बावनकुळे

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई - भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप-शिवसेना युती होणार हे अंतिम असल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकत्र बसून युतीच्या मुद्यावर चर्चा केली आहे. त्यांनी युतीचे स्पष्ट संकेत दिलेत. या प्रकरणी फार काही राहिले नाही, युतीचा तिढा जवळपास सुटला आहे, असे ते म्हणालेत.

मुंबई महापालिकेसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मतमोजणी होऊन निकाल घोषित होणार आहेत. त्यासाठी 23 डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पण अद्याप सत्ताधारी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटला नाही. पत्रकारांनी याविषयी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारले असता त्यांनी हा प्रश्न जवळपास सुटल्याचे स्पष्ट केले.

बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकत्र बसून युतीच्या मुद्यावर चर्चा केली आहे. त्यांनी युतीचे स्पष्ट संकेत दिलेत. त्यावर कामही सुरू झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी फार काही राहिले आहे असे मला वाटत नाही. तिढा जवळपास सुटला आहे. आमच्या जागांवर आम्ही आमचे उमेदवारही फायनल करत आहोत. ज्या ठिकाणी वाद असतील ते चर्चेने सोडवले जातील. पण 90 ते 95 टक्क्यांवर काहीही प्रॉब्लेम नाही.

बावनकुळे यांनी यावेळी दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीवरही भाष्य केले. ते म्हणाले, त्यांच्या पक्षात कुणाला घ्यायचे, कुणाला सोबत घ्यायचे हे ठरवण्याचा अधिकार त्यांचा आहे. त्यांच्या अंतर्गत बाबींवर मी बोलणे योग्य नाही. त्यांनी निर्णय करायचेत. अजित पवारांचा पक्ष काही ठिकाणी भाजपसोबत येत आहे. अकोल्यात असे घडत आहे. आमची चंद्रपूरसाठीही चर्चा सुरू आहे. अनेक ठिकाणी राष्ट्रवादी आमच्यासोबत आहे.

भाजपची मुंबईत 13 मित्रपक्षांशी चर्चा सुरू आहे. आमची रिपाइंशी चर्चा सुरू आहे. आमच्या घटक पक्षांशीही चर्चा सुरू आहे. नागपुरात जोगेंद्र कवाडेंशी चर्चा सुरू आहे. जयदीप कवाडे यांच्याशीही संवाद सुरू आहे. त्यामुळे त्या - त्या पातळीवर, त्या - त्या ठिकाणी, त्या - त्या पक्षाची क्षमता पाहून त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. या पक्षांना भाजप किंवा शिंदे गटाच्या कोट्यातून जागा दिली जाईल.

सध्या शरद पवार एनडीएत येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकारांशी बोलताना तसे संकेत दिलेत. पत्रकारांनी याविषयी बावनकुळेंना छेडले असता त्यांनी त्यावर भाष्य करण्यास नकार दिला. आज एनडीएचे निर्णय घेण्याचा अधिकार मला नाही. हा अधिकार केंद्रीय भाजपला आहे. आमचे पंतप्रधान मोदी व अमित शहा व जे पी नड्डा हे याविषयी ठरवतील. पण महाराष्ट्रात आता आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आम्ही भाजप - सेना महायुती म्हणून लढत आहोत. नगरपालिकेत आम्ही वेगवेगळे लढलो.

त्या - त्या स्थानिक राजकारणात काय परिस्थिती निर्माण होईल, स्थानिक पातळीवर कोणत्या युत्या होतील. आम्ही जास्त अधिकार स्थानिक लेव्हलला दिलेत. त्यानुसार त्या - त्या लेव्हलला सर्वकाही ठरत आहेत. त्याचा महायुतीवर काहीही परिणाम होणार नाही. राज्याच्या महायुतीवर काहीही परिणाम होणार नाही.



बावनकुळे म्हणाले, सुधीर मुनगंटीवार पक्षावर नाराज नाहीत. शांत आहेत. आम्ही सर्वजण शांतपणे बसलो आहोत. मुनगंटीवार यांच्याविषयी चुकीचा गैरसमज निर्माण केला जात आहे. कारण नसताना असे केले जात आहे. ना त्यांच्या मनात तसे काही आहे, ना आमच्या मनात तसे काही आहे. मुनगंटीवार आमचे नेते आहेत. राज्याचे महत्त्वाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात आम्ही चंद्रपूर व विदर्भातील महापालिका लढवत आहोत. स्थानिक पातळीवर पक्षप्रवेश होताना काही जुने कार्यकर्ते नाराज होतात. पण भाजपचा डीएनए असा आहे की, कुणी भाजपमध्ये नवे आले तर पक्ष त्याला सांभाळून घेतो.